रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २४६
www.ramprahar.com
रविवार, २४ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## 'शरीराचा प्रत्येक कण आणि आयुष्यातील क्षण समर्पित'



**कोलकाता** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि.२३) पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर असताना बारासातमध्ये नारी शक्ती वंदन अभिनंदन कार्यक्रमाला संबोधित केले. या वेळी ते म्हणाले की, मी अनेक वर्षे देशाच्या कानाकोपऱ्यात फिरलो. अनेकदा माझ्याकडे पैसे नसायचे, पण मी कधीही उपाशी राहिलो नाही. म्हणूनच मी म्हणतो की, हे १४० कोटी देशवासी माझे कुटुंब आहेत. आज देशातील प्रत्येक गरीब, शेतकरी, तरुण, बहीण आणि मुलगी म्हणते, मी मोदींचा परिवार आहे! जेव्हा मोदींना कोणतीही समस्या येते, तेव्हा या माता, बहिणी आणि मुली ढाल बनून उभ्या असतात. माझ्या शरीराचा प्रत्येक कण आणि आयुष्यातील प्रत्येक क्षण या कुटुंबाला समर्पित आहे. कार्यक्रमास भाजपचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

अंतरंग
बेकायदेशीर व्यवसायांवर पोलिसांची कारवाई/३
होळी करा लहान, पोळी करा दान!/६
रायगडच्या ज्युनिअर मुलांची क्रिकेट निवड चाचणी पेणला/८

# महायुतीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला लवकरच

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दिल्लीत माहिती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीतील जागावाटपाचे ८० टक्के काम पूर्ण झाले असून २० टक्के काम बाकी आहे. तेदेखील काम आम्ही पूर्ण करू. त्यानंतर तीन पक्षांतील जागावाटपाचा फॉर्म्युला लवकरच समोर येईल, असे भाजप नेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ते भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीसाठी नवी दिल्ली येथे आले असता प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



राज ठाकरे महायुतीत सहभागी होण्याबाबतची चर्चा सुरू आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या वक्तव्यांना उत्तर देताना म्हटले की, मी त्यांना टोमणे बहाद्दर ही उपमा दिली आहे. माझी उपमा कशी सार्थ ठरेल याचा आटोकाट प्रयत्न ते करीत असतात. माझे त्यांना आवाहन आहे की, त्यांनी एक वाक्य विकासावर बोलून दाखवावे. सामान्य माणसाच्या आयुष्यात तुम्ही काय बदल करणार आहात किंवा केला आहे? याबद्दल सांगण्यासारखे त्यांच्याकडे काहीही नाही.

मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले होते. माझ्यावर खोटे गुन्हे दाखल करून मला तडीपार केले जाऊ शकते, असे ते म्हणाले होते. यावर बोलताना, आमचे खूप हितचिंतक आहेत. ते मनोज जरांगे-पाटील यांच्याकडे जाऊन काहीतरी सांगत असतात. त्यावर जरांगे-पाटील बोलतात, पण असे कुणालाही तडीपार केले जात नाही. तडीपार करण्यासारखे त्यांच्यावर खटले दाखल आहेत का? तर तसे अजिबात नाही, असे गृहमंत्री असलेल्या फडणवीस यांनी स्पष्ट केले.

ज्या ठिकाणी जाळपोळ, तोडफोड झाली, पोलिसांवर हल्ला झालेला आहे अशा केसेस परत घेणे शक्य होणार नाही, मात्र इतर केसेस परत घेण्याची घोषणा करून त्यावर कामही सुरू केले आहे. सध्या आचारसंहिता लागली आहे. या काळात छाननी पूर्ण करून आचारसंहिता संपताच त्या केसेस मागे घेतल्या जातील, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



**पेण : होळीनिमित्त सर्वत्र उत्साह दिसून येत आहे. कोळीवाड्यात यंदाही आकर्षक सजावट करून होळी रचली जात असून ती नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे.** (छाया : इजाज मनियार)

# वंचितचा महाविकास आघाडीला २६ मार्चपर्यंतचा अल्टीमेटम

### ■ अन्यथा भूमिका स्पष्ट करू -प्रकाश आंबेडकर

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीत जागावाटपावरून तिढा आहे. यावरून वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर वैतागले असून आता तर त्यांनी २६ मार्चपर्यंत आम्ही थांबणार; अन्यथा आमची भूमिका जाहीर करणार आहोत, अशा स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे.

मुंबईत शनिवारी (दि.२३) पत्रकार परिषदेत बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, महाविकास आघाडीचा तिढा तो त्यांनाच तुम्ही विचारा. आम्हाला काहीच माहिती नाही. १० जागांवरून शिवसेना आणि काँग्रेसमध्ये वाद आहे. पाच जागांवर तिन्ही पक्षांमध्ये टाय आहे. तुम्ही आम्हाला सहकार्य केले असते तर घोंगडे भिजत पडले नसते. तुम्ही आम्हाला टार्गेट केले. म्हणून त्यांना त्यांचे कोंबडे झाकता आले. त्यांचा कोंबडा आता बांग देऊ लागला आहे.



महाविकास आघाडीचा तिढा मिटणार नसेल तर आमची एन्ट्री होऊन काय उपयोग आहे. आज सकाळी आम्ही सांगितले आहे. २६ तारखेपर्यंत आम्ही थांबणार; अन्यथा आमची भूमिका जाहीर करणार आहोत. यामध्ये काँग्रेसला सात जागांना पाठिंबा देऊ. आम्ही काँग्रेसला चॉईस दिली आहे. जर त्यांचे जमले नाही तर प्रत्येकाला ४८ जागा लढवाव्या लागतील, असे आंबेडकर यांनी म्हटले.

महाविकास आघाडीकडून आम्हाला चार जागा कधीच ऑफर केल्या गेल्या नाहीत, तर फक्त तीन जागा ऑफर केल्या गेल्या. त्यातील एक जागा अकोल्याची होती. आम्ही काय म्हणतोय कॅरी करण्यापेक्षा संजय राऊत काय म्हणतात हे जास्त कॅरी केले जातंय, असेही आंबेडकर यांनी या वेळी उद्विग्नपणे सांगितले.

## कांदा निर्यातबंदी आणखी वाढवली

**नवी दिल्ली** : कांदा निर्यातीवर घातलेली बंदी केंद्र सकारकडून शनिवारी (दि.२३) आणखी वाढवण्यात आली. यापूर्वी हे निर्बंध ३१ मार्चपर्यंत लावण्यात आले होते. आता ही निर्यातबंदी अनिश्चीत काळापर्यंत पुढे वाढवण्यात आली आहे.

भारत हा कांद्याचा प्रमुख निर्यातदार देश आहे. कांद्याचे वाढते दर नियंत्रणात ठेवण्यासाठी त्याच्या निर्यातीवर डिसेंबर २०२३मध्ये बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला. हे निर्बंध ३१ मार्च २०२४पर्यंत लावण्यात आले होते. आता ते वाढविण्यात आले आहेत.

## निवडक

### रशियात दहशतवादी हल्ला; १००हून अधिक जण ठार

**मॉस्को** : रशियाची राजधानी मॉस्को शहरात एका कॉन्सर्ट हॉलमध्ये दहशतवादी हल्ला झाला असून यात १००हून अधिक जणांचा मृत्यू, तर अनेक लोक जखमी झाले आहेत. मृतांची संख्या आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या हल्ल्याची जबाबदारी इस्लामिक स्टेट ग्रुपने घेतलीय.

### भारतीय नौदलाकडून ३५ समुद्री चाचे जेरबंद

**मुंबई** : भारतीय नौदलाने ऑपरेशन संकल्प अंतर्गत सोमालिया किनारपट्टीवरून ३५ समुद्री चाचांना पकडले आहे. नौदलाला मिळालेल्या माहितीच्या आधारे अरबी समुद्रात एमवी रुएन हे जहाज रोखण्यात आले. या जहाजाचा वापर व्यापारी जहाजांवर हल्ले करण्यासाठी केला जात होता. ४० तासांच्या थरारक कारवाईनंतर ३५ समुद्री चाचांना ताब्यात घेण्यात आले. त्यांना मुंबईत पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले आहे.

राम प्रहर

### सोमवारचा अंक नाही

**होळी सणानिमित्त 'राम प्रहर'च्या कार्यालयास रविवारी सुटी असल्यामुळे सोमवारचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी आणि हितचिंतकांनी नोंद घ्यावी.**

**होळीच्या सर्वांना शुभेच्छा!**

**-मुख्य संपादक**

# दिव्यांग मतदारांना 'सक्षम'ची साथ

### मतदानासाठी ॲपच्या माध्यमातून विविध सुविधा



**रायगड : रामप्रहर वृत्त**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाकडून ४० टक्क्यांहून अधिक दिव्यांग असणाऱ्या व्यक्तींसाठी आणि ८५ वर्षे पूर्ण झालेल्या वयोवृद्धांना मतदान प्रक्रिया सुलभ होण्याच्या दृष्टीने सक्षम ॲप सुरू करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून त्यांना अधिकच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत.

सक्षम ॲपवर दिव्यांग मतदारांसाठी दिव्यांग म्हणून नोंदणी करण्याची, नवीन मतदार नोंदणीसाठी, मत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हस्तांतरित करणे, मतदान केंद्र बदलाची व व्हीलचेअरची विनंती करता येत असून मतदार यादीत नाव शोधण्याची, मतदान केंद्र जाणून घेणे, तक्रारी नोंदविणे, मतदान अधिकारी शोधणे, बूथ लोकेटर स्थिती तपासणे इत्यादी सुविधाही उपलब्ध करून दिल्या आहेत. रायगड लोकसभा मतदारसंघात एकूण आठ हजार ४६ दिव्यांग मतदार आहेत. यापैकी दोन हजार ९३३ महिला, तर पाच हजार १३३ पुरुष मतदार आहेत.

सक्षम ॲपवर अंधत्व, अल्प दृष्टी, बहिरेपणा, कमी श्रवणशक्ती, शारीरिक व्यंग, मानसिक आजार (मानसिक सामाजिक अपंगत्व), कुष्ठरोग, बौद्धिक अपंगत्व, सेरेब्रल पाल्सी, बौनेत्व, मस्कुलर डिस्ट्रोफी, ॲसिड हल्ल्यातील बळी, भाषण आणि भाषेतील अपंगत्व, विशिष्ट शिकण्याची अक्षमता, ऑटिझम, स्पेक्ट्रम विकार, मल्टिपल स्क्लेरोसिस आणि पार्किन्सन रोगासह क्रॉनिक न्यूरोलॉजिकल विकार, हिमोफिलिया, थैलेसेमिया आणि सिकल सेल ॲनिमियासह रक्त विकार आणि एकाधिक अपंगत्व असलेल्या व्यक्ती नोंदणी करू शकतात.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्ह्यात दिव्यांग व्यक्तींसाठी सर्व ठिकाणी मतदान केंद्र तळमजल्यावर असतील. तेथे पिण्याचे पाणी, प्रतीक्षा शेड, वैद्यकीय किट, सुलभ शौचालय, मतदान केंद्रांवर पुरेशी विद्युत रोषणाई, केंद्रांवर रॅम्प आणि व्हीलचेअरची सोय, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांसाठी प्राधान्याने प्रवेश सुविधा, स्वतंत्र रांगेची सुविधा, मानक चिन्हे आणि साइन बोर्ड असतील.

मतदान केंद्रावर स्वयंसेवक सहाय्य उपलब्ध असणार आहे. अंध आणि अशक्त मतदारांच्या मतांची नोंद करण्यासाठी ईव्हीएमवर ब्रेल लिपीची व मदतनीसाची सुविधादेखील उपलब्ध आहे.

# हिमाचल प्रदेशमध्ये राजकीय उलथापालथ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राज्यसभा निवडणुकीच्या वेळी क्रॉस व्होटिंग केल्याने विधानसभा अध्यक्षांनी अपात्र ठरविलेल्या काँग्रेसच्या सहा आमदारांनी तीन अपक्ष आमदारांसह शुक्रवारी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. यामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. आमदारांनी राजीनामा दिला असल्याने येथे १ जून रोजी पोटनिवडणूक होणार आहे. या पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार जिंकून आल्यास काँग्रेसचे सरकार कोसळण्याची शक्यता आहे.

नुकत्याच झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या सहा आमदारांनी भाजपच्या उमेदवाराला मतदान केले होते. त्यामुळे संख्या असतानाही काँग्रेसच्या अभिषेक मनू सिंघवी यांचा पराभव झाला होता. या निवडणुकीत काँग्रेसचे सहा आमदार व तीन अपक्ष अशा नऊ जणांनी भाजपच्या उमेदवाराला मतदान केल्याने हर्ष महाजन विजयी झाले. दरम्यान, २९ फेब्रुवारी रोजी विधानसभा अध्यक्षांनी काँग्रेसच्या सहा आमदारांना अपात्र ठरविले होते.

### आमदारांचा पक्षप्रवेश; काँग्रेस सरकार धोक्यात!

दुसरीकडे तीन अपक्ष आमदारांनी शुक्रवारी विधानसभा सचिव यश पॉल शर्मा यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला आणि आम्हीदेखील भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे त्यांच्या मतदारसंघातही पोटनिवडणूक होण्याची शक्यता आहे.

### अटीतटीची लढत

काँग्रेसचे सहा आमदार अपात्र ठरल्याने ६८ सदस्यीय विधानसभेत सत्ताधारी काँग्रेसचे संख्याबळ ४०वरून ३४वर आले आहे; तर भाजपचे २५ आमदार आहेत. पोटनिवडणुकीत भाजपमध्ये दाखल झालेले सहा आमदार जिंकून आल्यास भाजपचे संख्याबळ ३१ होईल तसेच तीन अपक्षांचा पाठिंबा मिळाल्याने ही संख्या ३४वर जाईल. त्यामुळे आगामी काळात हिमाचल प्रदेशमध्ये अटीतटीची लढत आहे.




# होळीसाठी चाकरमानी गावाकडे

### मुंबई-गोवा महामार्ग वाहनांनी फुलला



**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई, पुण्यातील नोकरदारवर्ग होळीसाठी आपल्या गावाकडे या सणाचा आनंद घेण्यासाठी निघाल्याने मुंबई-गोवा महामार्गावर शनिवारी (दि.२३) वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. माणगाव, इंदापूर आदी शहरातील नाक्यांवर मोठ्या प्रमाणात वाहने दिसून आली.

महामार्गावर शहरांच्या दोन्ही बाजूस दोन ते तीन किलोमीटर लांब वाहनांची रांग लागल्याचे दिसत होते. माणगाव येथून खरवली फाटा हे तीन किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी प्रवाशांना २० ते ३० मिनिटांचा कालावधी लागत होता. काही चालकांनी लेनची शिस्त न पाळल्याने वाहतूक कोंडीची समस्या अधिकच बिकट झाली. बेशिस्त वाहनचालकांना आवर घालताना वाहतूक पोलिसांना बरीच मेहनत घ्यावी लागत असल्याचे पहावयास मिळाले.

# आगामी सणांमध्ये शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे

## रोहा पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांचे आवाहन

**रोहे : प्रतिनिधी**

आगामी सणांमध्ये समाज माध्यमातून कोणताही वाद उद्भवू नये यासाठी नागरिकांसह तरुणांनी जबाबदारी पुर्वक समाज माध्यमांवर व्यक्त व्हावे असे सांगत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आपण सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन रोहा पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांनी केले.



होळी, धुलीवंदन, ईद, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, लोकसभा निवडणूक या अनुषंगाने रोहा पोलीस ठाणे येथे शांतता समितीची सभा रोहा पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या वेळी पोलिस निरीक्षक देविदास मुपडे यांनी मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

मुपडे यांनी मार्गदर्शन करताना होळी सणाला कोणते अनुचित प्रकार घडत असेल तर पोलिसांना त्वरीत कळवावे. रोहा पर्यटन क्षेत्र असल्याने मोठ्या प्रमाणात पर्यटक सुट्टीत येत असल्याने वहातुक कोंडी होण्याची शक्यता असल्याने प्रत्येकांनी वहातुक कोंडी होवु नये यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. निवडणुकीच्या काळात विविध पथके नेमण्यात आले आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या काळात आचार संहिता भंग होवु यासाठी प्रत्येकांनी काळजी घेण्याची आवश्यकता आहे. होळी, धुलीवंदन, ईद, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, लोकसभा निवडणूक या अनुषंगाने रोहा पोलीस ठाणे हद्दीतील लोकप्रतिनिधी, समाज सेवक, शांतता समितीचे सदस्य, मोहल्ला कमिटी व पत्रकार यांनी समाजात कुठलाही प्रकारचा वाद होवु नये, कोणत्याही प्रकारचे गालबोट लागू नये यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावेत. कोणतीही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आपण सर्वांनी आपल्यास कळल्यास पोलिसांना कळवावे, असेही मुपडे म्हणाले.

या शांतता समितीच्या बैठकीस माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, समीर सकपाळ, सकल मराठा समाज अध्यक्ष अप्पा देशमुख, मनसे जिल्हा सचिव अमोल पेणकर, कोळी समाज जिल्हा संपर्कप्रमुख सुर्यकांत वाघमारे, वंचित बहुजन समाज पार्टी अध्यक्ष देविदास जाधव, रियाज शेटे, समिर देवरे, जालिंदर शेवाळे यासह शांतता समितीचे सदस्य, मोहल्ला कमिटी सदस्य, समाज सेवक, पत्रकार, पोलिस पाटील व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# वाढत्या उष्णतेमुळे परीक्षेच्या वेळा बदलण्याची पालकवर्गाची मागणी



**धाटाव : प्रतिनिधी**

सध्या सर्वत्र परीक्षांचा हंगाम सुरू असून बारावीची परीक्षा संपली असून दहावीचीही परीक्षा अंतिम टप्प्यावर आली आहे. तर होळी सणानंतर लगेचच सर्वत्र वार्षिक सत्र परीक्षा सुरू होणार असून या परीक्षांच्या वेळा दुपारी असल्याने रखरखत्या उन्हात परीक्षेला जाताना आणि परीक्षेचा पेपर सोडवताना विद्यार्थ्यांचा अक्षरक्ष: घाम निघणार आहे. पालकांनी या बदललेल्या वेळेबाबत स्पष्ट नाराजी व्यक्त केली असूनया परीक्षा वेळापत्रकात बदल करावे अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.

दरवर्षीच्या परीक्षा हंगामाचा विचार करता माध्यमिक शाळांच्या इतिहास पाहिले तर उन्हापासून लहान मुलांचे संरक्षण व्हावे यासाठी लहान मुलांची परीक्षा या सकाळ सत्रात घेतल्या गेल्या आहेत. परंतू यावर्षी मात्र शासनाने कसलाही विचार न करता सरसकट स.११ ते दु.१ व दु.२ ते ५ या वेळेत पेपर लिहिण्याचा कालावधी ठेवण्यात आला आहे. दरवर्षी वार्षिक परीक्षा या सकाळ सत्रात घेतल्या जातात, परंतू या वर्षी मात्र शासनाने लहान मुलांच्या कोवळ्या वयाचा विचार न करता स. ११ ते दु.१ या वेळेत परीक्षेचा घाट घातला आहे. सध्या वातावरणातील उष्म्याचे प्रमाण दिवसागणिक कमालीचे वाढत चालले आहे.

एप्रिल आणि मे महिन्यातील वातावरणा सारखी परिस्थिती आताच जाणवू लागली आहे. तापमान कमालीचे वाढले आहे, वाढत्या उष्णतेमुळे विविध प्रकारच्या शारीरिक व्याधींसह शरीराला चांगलाच थकवा जाणवू लागला आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने या परीक्षा वेळापत्रकात तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.

# पनवेल मनपातर्फे 'माझी वसुंधरा' अंतर्गत महाविद्यालयामध्ये रंगली इको ब्रीक स्पर्धा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अभियान ४.० व स्वच्छ भारत अभियान अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षण या विषयावर सातत्याने शालेय, महाविद्यालयीन स्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. पर्यावरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी विविध कार्यक्रम पनवेल महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. या अंतर्गत उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरींग्ज येथे महापालिकेच्या वतीने इको ब्रीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या वेळी पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरींगजचे प्राचार्य डॉ. संदीप जोशी महापालिका पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, घनकचरा व स्वच्छता विभागाचे विभाग प्रमुख अनिल कोकरे, अप्लाइड सायन्स विभाग प्रमुख डॉ.अरुण पिल्लई, कार्यक्रम समन्वयक डॉ. बिश्वजीत पांडा, एनएसएस समन्वयक अर्चना इंगोले, प्राध्यापक अक्षय जाधव,नेचर क्लबचे सोनाली निकम, डॉ. सुरभी तसेच परीक्षक डॉ. शबाब रिझवी, रश्मी जोशी, प्राध्यापक दुर्गाराव व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या इको ब्रीक स्पर्धेत, वापरलेल्या प्लास्टिक बाटल्यामध्ये वापरलेल्या प्लास्टिक पिशव्या भरून त्यापासून विविध वस्तू, पुतळे असे दहा मॉडेल्स तयार करण्यात आले होते. नागरिकांनी प्लास्टिकचा पुर्नवापर करावा, असा संदेश या स्पर्धेतून देण्यात आला. या वेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना महापालिका माझी वसुंधरा अंतर्गत करत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी झाडे दत्तक घेऊन त्यांना वाढविण्याविषयी सांगण्यात आले. तसेच माझी वसुंधराची प्रतिज्ञा घेण्यात आली. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेमध्ये सुमारे ७००विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांची रुग्णसेवा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल तहसीलदार विजय पाटील यांनी कर्तव्यदक्षपणे खारघर येथील एका रुग्णाला रेशन कार्डवरून मोफत आरोग्य सेवा मिळवून दिली आहे.



खारघर येथील दीपक पिल्ले यांना हृदयविकाराचा त्रास होत असल्याकारणाने त्यांच्यावर डॉक्टरांनी सांगितल्यानुसार लगेच हृदय शस्त्रक्रिया (एन्जोप्लास्टी) करणे गरजेचे होते, परंतु त्यांची परिस्थिती हलाखीची असल्याकारणाने त्यांना कुठल्याही खासगी मोठ्या रुग्णालयात शस्त्रक्रिया करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नव्हते. त्यांची पत्नी दीपा पिल्ले यांनी सामाजिक कार्यकर्ते किरण पाटील यांच्याकडे धाव घेत मदतीची मागणी केली. ही बाब किरण पाटील यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी रुग्णालयांची संपर्क साधला असता त्या रुग्णाकडे जर नारंगी रेशन कार्ड असेल तर त्यांचे हृदय शस्त्रक्रिया हे मोफत होऊ शकते, असे सांगितले.

कुटुंबाकडे शिधापत्रिका नव्हती व जी शिधापत्रिका होती ती रुग्णाच्या वडिलांच्या नावाने होती व ती पांढरी असल्याकारणाने त्यांना त्या योजनेचा लाभ घेता येत नव्हता. हीच बाब कार्यतत्पर कार्यकर्ते किरण पाटील यांनी पनवेलचे कार्यक्षम तहसीलदार विजय पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली व तहसीलदार विजय पाटील यांनी देखील तत्काळ एक कर्तव्यदक्ष प्रशासकीय अधिकारी कसा असतो याचे एक उदाहरण म्हणून त्यांनी तत्काळ किरण पाटील यांनी केलेल्या वैद्यकीय मदतीसाठी प्रशासकीय अडचणी बाजूला ठेवत तत्काळ या रुग्णाला मदतीच्या भावनेने शिधापत्रिका वेगळी करून दिली. त्यामुळे २ फेब्रुवारी रोजी वाशी येथील एमजीएम रुग्णालयात या रुग्णावर मोफत हृदय शस्त्रक्रिया झाली. आता दीपक पिल्ले हे अतिशय आनंदी आहेत व त्यांनी स्थानिक सामाजिक कार्यकर्ते किरण पाटील यांना घेत पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांना पुष्पगुच्छ देऊन धन्यवाद व्यक्त केले.

दीपक पिल्ले यांनी सांगितले की, तहसीलदारांच्या कर्तव्यदक्ष पणामुळे आज माझे प्राण वाचले आहेत त्यामुळे अशा अधिकाऱ्याला परमेश्वर उदंड आयुष्य देवो. तहसीलदारांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक सामाजिक कार्यकर्ते किरण पाटील यांनी देखील केले.



**पाली : होळीनिमित्त लहानगे मोबाईलच्या दुनियेतून बाहेर येतांना दिसत आहेत. पालीत एका होळीवर पिल्लू लावण्याच्या कामात दंग लहानगे.** (छाया : धम्मशील सावंत)

# मुरूड साळीवाडा येथे शहीद दिनानिमित्त अभिवादन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जुनी पेठ साळीवाडा येथील देशभक्त तथा समाजसेवक मोहन गजानन करंदेकर यांच्या निवासस्थानी क्रांतीवीर भगतसिंग राजगुरू व सुखदेव यांच्या ९३वा स्मृतीदिन हा शासन नियमाप्रमाणे शहीद दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या वेळी आलेल्या शेकडो मान्यवरांनी क्रांतीवीराना फुल वाहुन आदरांजली वाहण्यात आली.



भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी भगतसिंग, सुखदेव, राजगुरु या स्वातंत्र्य सौनिकांचा ब्रिटीश साम्राज्यवादाच्या जोखडातुन मुक्त करण्याचा ध्यास होता. सन १९२८मध्ये इंग्रजांच्या सेंदुक असेम्बली सरकारला अनिर्बध सत्ता देणारी दोन विधेयके मांडली जाणार होती.सेंदुक असेम्बलीचे अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल यांचे भाषण संपल्यानंतर प्रेक्षकांच्या गॅलरीतुन भगत सिंग यांनी बॉब फेकले तसेच लाला लजपजराय यांच्या मुत्युचा बदला घेण्यासाठी सॉडर्स या इंग्रज अधिकाऱ्यावर गोळ्या झाडल्यामुळे आणि क्रांतीचा जयजयकार करी जात असतांना पोलिसांनी त्यांना पकडले त्यानंतर पोलिसांनी त्यांना पकडले त्यानंतर न्यायालयाने त्यांना फाशीची शिक्षा सुनावली भगतसिंग, राजगुरु व सुखदेव हे तिघेजण २३ मार्च १९३१ ला लाहोरच्या सेंट्रल जेलमध्ये इन्किलाब झिंदाबाद, भारतमाता की जय या घोषणा देत सायंकाळी फाशीला सामोरे गेले.

हा इतिहास अभ्यासक्रमाच्या पुस्तकांतुन अशा शुर वीरांचा खरा इतिहास नवीन पिढीला समजला पाहिजे, अशी मोहन करंदेकर इच्छा व्यक्त करतात कारण प्राणपणाने लढुन लिहिलेली ती दिव्य विजयकथा आहे ती प्रत्येक भारतीयांना कळली पाहिजे, असे मत समाजसेवक मोहन करंदेकर यांनी केले. मोहन करंदेकर गेली ४२ वर्ष या दिवशी पहाटे पासुन पाण्याचा एक थेंब ही प्राशन न करता निर्जळी उपवास करतात.

या वेळी देशभक्त- मोहन करंदेकर, देशभक्त कोश पुस्तकाचे लेखक चंद्रकांत शहासने, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, माजी नगरसेवक मनोज भगत, अजित कासार, मंगेश दांडेकर, श्रीकांत सुर्वे, वासंती उमरोटकर, नगेन सिंग, अजित कारभारी, गिरीश साळी, महेश भगत, स्वप्निल कवळे, ऋषी पोतदार, रुपेश भाटकर, मानसी करंदेकर, राजेश गुप्ते शालेय विद्यार्थी व असंख्य मान्यवर भेट देऊन वीर हुतात्म्यांना मानवंदना देण्यात आली. या वेळी माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी चंद्रकांत शहासने यांना शाल श्रीफळ देऊन सन्मानित केले.

# हजरत सय्यद बालेशहा दर्गा शरीफ तोडण्याची कारवाई तूर्त स्थगित

**ठाणे : प्रतिनिधी**

मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील चौक गाव येथे सुमारे ३०० वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून असणारा हजरत सय्यद बालेशहा दर्गा शरीफ तोडण्याची नोटीस नुकतीच पाठवण्यात आली. या संदर्भात भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा मावळ लोकसभा मतदारसंघ निवडणूक संयोजक सय्यद अकबर यांनी संबंधित अधिकाऱ्यांची तातडीने भेट घेऊन वस्तुस्थिती निदर्शनात आणून दिली तसेच मुस्लिम धर्मीय बांधवांच्या रमझान या अत्यंत पवित्र महिन्यात असे का म्हणून करता? म्हणत गांभीर्य लक्षात आणून दिले. अखेरीस न्यायालयाकडून निर्णय येईपर्यंत कुठल्याही प्रकारची कारवाई करणार नाही, असे आश्वासन अप्पर तहसीलदार निलेश गौंड यांनी दिल्यानंतर तूर्तास या वादावर पडदा पडला आहे.





मीरा भाईंदर येथील चौक गाव समुद्रकिनारी असणारा हजरत सय्यद बालेशहा पीर दर्गा शरीफ सुमारे तीनशे वर्षांहून अधिक कालावधीपासून तो अस्तित्वात असल्याचे दस्तावेज उपलब्ध आहेत. हा दर्गा हा पाच ते सात शतके पुरातन असल्याची शक्यतादेखील आहे. असे असताना पाठवलेल्या नोटिसीमुळे येथे नित्यनेमाने धार्मिक विधी करणाऱ्या मुस्लिम आणि हिंदू धर्मीयांच्यात दुःख आणि राग अशी मिश्र प्रतिक्रिया उमटली. दर्ग्याच्या विश्वस्त मंडळाने सामाजिक कार्यकर्ते हुसेन सय्यद यांच्या माध्यमातून भाजप नेते सय्यद अकबर यांच्याशी संपर्क साधला. अकबर यांनी तातडीने ठाणे जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी यांची भेट घेऊन त्यांना वस्तुस्थितीची जाणीव करून दिली. या वेळी दर्गा विश्वस्त कमिटीच्या सदस्यांनीदेखील याबाबत कैफियत मांडली. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने न्यायालयाचा निर्णय येण्यापूर्वी अशा प्रकारे नोटीस पाठवणे म्हणजे न्यायालयाचादेखील अवमान आहे, असे सांगण्यात आले. अखेरीस अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे निर्देश येईपर्यंत आम्ही कुठल्याही प्रकारची कारवाई करणार नाही, असे आश्वासन दिले.

या आश्वासनामुळे हजरत सय्यद बालेशहा पीर दर्गा शरीफ येथे येणाऱ्या मुस्लिम आणि हिंदू बांधवांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. दर्ग्याचे मुख्य विश्वस्त माजी नगरसेवक अमजद शेख यांनी सय्यद अकबर यांचे मनापासून आभार मानले.

या वेळी अकबर म्हणाले की प्रकरणातील गांभीर्य लक्षात येताच मी तातडीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे मार्गदर्शन घेतले. त्यांच्या सहकार्यामुळेच येथील मुस्लिम आणि हिंदू बांधवांना न्याय देण्यात आम्हाला यश आले आहे.

संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेताना दर्ग्याचे मुख्य विश्वस्त माजी नगरसेवक अमजद शेख, विश्वस्त अब्रार शेख, अफसर खान, अफजल शेख, कलाम खान, वाहिद खान, समन्वयक हुसेन सय्यद, बंदा नवाझ मनियार आदी उपस्थित होते.

# २५० दिवस अखंडित वीज उत्पादनाचा विक्रम

**पारस : प्रतिनिधी**

महानिर्मितीच्या अकोला येथील पारस वीज केंद्राने वीज उत्पादनात कायम नावलौकिक राखला आहे. २५० मेगावाट क्षमतेचा हा संच क्रमांक ४ सलग मागील २५० दिवसांपासून सुरू आहे. अखंडित वीज उत्पादन करीत असल्याने वीज उत्पादनाच्या क्षेत्रात या संचाने नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. पारस संच क्रमांक-३ च्या नावे या अगोदर अखंडित वीज उत्पादनाची १६६ दिवसांच्या विक्रमाची नोंद आहे.

पारस संच क्रमांक ४ ने या २५० दिवसांत १२९०.४८१ मिलियन युनिटस आणि सरासरी २१५ मेगावाट सह वीज उत्पादन केले आहे. महानिर्मितीच्या इतिहासात अखंडित वीज उत्पादनात चंद्रपूर वीज केंद्र २१० मेगावाट संच क्रमांक ३ च्या नांवे सन २००९ मध्ये २६६ दिवसांच्या अखंडित वीज उत्पादनाच्या विक्रमाची नोंद आहे. उन्हाळ्यात विजेची वाढती मागणी लक्षात घेता, पारस वीज केंद्र महत्तम वीज उत्पादनासाठी सज्ज असल्याचे मुख्य अभियंता शरद भगत यांनी सांगितले.

# होळी पेटवताना खबरदारी घ्या!

## महावितरणकडून नागरिकांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

होळीच्या उत्सवाला विजेच्या अपघाताने गालबोट लागू नये यासाठी होळी पेटवितांना संभाव्य अपघात टाळण्याकरिता आवश्यक ती खबरदारी घेत होळीचा आनंद द्विगुणित करण्याचे आवाहन करंजाडे महावितरणचे सहाय्यक अभियंता अमित पालवे यांच्याकडून करण्यात आले आहे.



होळी पेटविताना सभोवताली वीजवाहिन्या किंवा वितरण रोहीत्रे नाहीत याची खातरजमा करून घ्या, अन्यथा होळीच्या ज्वाळांनी वीजवाहिन्या वितळून जीवंत तार खाली पडून भीषण अपघात होण्याची शक्यता असते. याशिवाय अनेक ठिकाणी वीजवाहिन्या ह्या भुमिगत असल्याने, त्यापासून लांब अंतरावरच होळी पेटवावी जेणेकरून होळीच्या उष्णतेपासून भुमिगत वीजवाहिन्या सुरक्षित राहतील, होळी पेटविताना शक्यतो मोकळ्या जागेचा वापर करा, ट्रक किंवा इतर वाहनांतून होळी आणताना होळीचा स्पर्श रस्त्यालगतच्या वीजवाहिन्यांना होणार नाही याची खबरदारी घ्या, विजेचे अपघात हे प्राणघातक असल्याने एक चूकही प्राणांतिक अपघातास कारणीभूत ठरू शकते. त्याचप्रमाणे रंगोत्सव साजरा करताना पाण्याचे फवारे वीजवाहिन्यापर्यंत उडणार नाही याची काळजी घ्या. रंग भरलेले फुगे फेकताना ते वीजेचे खांब आणि वीजवाहिन्या यांना लागणार नाही याची खबरदारी घ्या. विज वितरण यंत्रणेचे रोहीत्रे व तत्सम वितरण उपकरणे बसविलेल्या जागेपासून लांब अंतारावरच रंग खेळा. रंग खेळताना ओल्याचिंब शरीराने वीज खांबाला स्पर्श झाल्यास अपघाताचा संभाव्य धोका असल्याने वीजेचा खांबांना स्पर्श करू नका. वीजेच्या खांबाभोवती पाण्याचा निचरा होणार नाही याची खबरदारी घ्या.

घरात होळी खेळताना वीज मिटर, वीजेचे प्लग, वीजतारा आणि वीज उपकरणांचा पाण्यापासून बचाव करा, ओल्या हाताने वीजेच्या बटनांना स्पर्श करू नका. होळीचा सण हा आनंदाचा रंगोत्सव असल्याने खबरदारी घेऊन होळीचा सण साजरा करून आनंद द्विगुणीत करण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

**अशी घ्या काळजी...**

- **वीज वितरण यंत्रणेपासून लांब अंतरावर होळी पेटवा**
- **लाकडे आणताना त्यांचा स्पर्श वीज वाहिन्यांना होऊ नये**
- **वीज वाहिन्या, वितरण रोहीत्रांवर पाणी फेकू नका**
- **ओल्या शरीराने वीज उपकरणांना स्पर्शकरू नका**
- **वीज खांबाभोवती पाण्याचा निचरा करु नका**

# उरणमध्ये पोलिसांचा रूटमार्च

## लोकसभा निवडणुकीची सर्वत्र तयारी सुरू

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

मावळ लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शनिवारी (दि. २३) उरण परिसरात ठिकठिकाणी पोलिसांनी रूटमार्च केले. मावळ लोकसभेसाठी मतदान १३ मे रोजी होणार आहे. लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर निवडणुका शांततेत पार पडण्यासाठी उरण पोलिसांनी रूटमार्च केले.

न्हावाशेवा बंदर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ.विशाल नेहूल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सतिश निकम, पोलीस निरीक्षक सुर्यकांत कांबळे आणि मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुनील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हा रूटमार्च काढण्यात आला होता.

सशस्त्र रुटमार्चमध्ये आरसीएफचे तीन अधिकारी,३२ कर्मचारी आणि आठ एपीआय, पोलिस उपनिरीक्षक व ३० पोलीस अंमलदार शस्त्र, लाठी, हेल्मेट वाहनांसह सहभागी झाले होते. जासई नंतर उरण चारफाटा पासून मोरा–भवरा, उरण शहर आणि कोट नाकापर्यंत पोलिसांनी रुटमार्च केले. या दरम्यान परिसरातील महत्वाची, संवेदनशील आणि लोकवस्तीच्या ठिकाणी जनजागृती करून निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्याचे आवाहन केले.



# बेकायदेशीर व्यवसायांवर कारवाई

## लोकसभा निवडणुकीसाठी पोलिसांची मोहीम



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलिसांची लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यक्षेत्रात ऑल आउट ऑपरेशन मोहीम पोलीस उपायुक्त परिमंडळ २चे विवेक पानसरे, सहाय्यक पोलीस आयुक्त पनवेल विभागाचे अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील व पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यांनी विविध परिसरात जाऊन राबविली. या वेळी मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर व्यवसायावर कारवाई करण्यात आली.

यामध्ये प्रामुख्याने अंमली पदार्थ विरूद्ध कारवाई करताना दोन आरोपी अटक करण्यात आले असून त्यापैकी एका महिला आरोपीचे घरझडतीमध्ये ४८,८४० रुपये किमतीचा २.३९६ कि.ग्रॅ कोरडा गांजा जप्त करण्यात आला आहे. तसेच अंमली पदार्थाचे सेवन करणारे दोन व्यक्तींवर कारवाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे भारतीय हत्यार कायदा ३(२५) प्रमाणे एक गावठी पिस्तुल व पाच जिवंत राऊंड जप्त करून एका आरोपीला अटक केली आहे. तसेच भारतीय हत्यार कायदा क–४ (२५) प्रमाणे एक लोखंडी धारधार घातक शस्त्र जप्त करण्यात आले आहे. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम ६५(ई) अन्वये एकूण ११ गुन्हे दाखल करून देशी, विदेशी व हातभट्टी दारू (विनापरवाना विक्री) जप्त करण्यात आली आहे. परिसरातील हिस्ट्रीशिटर, गुंडा चेकिंग करण्यात आली यात तीन जण मिळून आले.

पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये दोन ठिकाणी नाकाबंदी करून कारवाई करण्यात आली होती. या ऑल आऊट ऑपरेशनकरिता पनवेल तालुका पोलीस ठाणे कडील दोन पोलीस निरीक्षक, सहा सपोनि/ पोउपनि, ४४ पोलीस अंमलदार हजर होते. अशी माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अनिल पाटील यांनी दिली.

# सार्वजनिक पाणपोईची रसायनीकरांची मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा हा औद्योगिकीकरणाने नटलेला परिसर असून वाढत्या औद्योगिकरणामुळे या भागातील लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. मे महिन्यात अधिकच गरमी असल्याने उष्माघाताने हैराण झालेल्या नागरिकांना आपली तहान शमविण्यासाठी बाटलीतले विकतचे पाणी घेवून प्यावे लागत आहे.

परिसरातील काही गावांना पाणीटंचाईची समस्या नागरिकांना सतावत आहे. याचा गैरफायदा उचलून पाणी विक्री चढत्या दरात होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

यामध्येही ज्यांचे खिसे भरलेले आहेत त्यांना बंद बाटलीतील पाणी विकत घेण्याचा खर्च पेलावतो. त्यामुळे घराबाहेर पडल्यावर सामान्य नागरिक तहान लागल्यावर उपलब्ध असेल ते पाणी पितो...! या वेळी मिळणारे पाणी अस्वच्छ असेल तर नक्कीच आजारपणाला ते निमंत्रण असते. परिसरात जीवनावश्यक असणारी पिण्याच्या पाण्याबाबतच्या या समस्येचे निराकरणही होत नाही.

दरम्यान, परिसराचा केद्रबिंदु व मुख्य बाजारपेठेचे ठिकाण असणाऱ्या मोहोपाडा शहरात खरेदीसाठी आसपासच्या गावातील नागरिक येत असतात. या वेळी बाजारात खरेदी झाल्यानंतर पिण्याचे पाणी शोधण्याकडे त्यांचा कल असतो. अशावेळी तहान भागविण्यासाठी बाटलीतले पाणी विकत घ्यावे लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मोहोपाडा गावाच्या प्रवेशद्वाराजवळ सार्वजनिक पाणपोईची गरज असल्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# होळीनिमित्त बेलापूर–पेंधर मेट्रोच्या वेळापत्रकात बदल

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडकोच्या मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर वरील मेट्रो सेवा सोमवारी (दि. २५) होळी (धूलिवंदन)निमित्त सकाळच्या वेळेत बंद राहणार असून दुपारी २ पासून मेट्रो सेवा पुन्हा सुरू होणार आहे.

या दिवशी दुपारी २ ते रात्री १० या वेळेत मेट्रो सेवा दर १५ मिनिटांनी उपलब्ध असणार असल्याचे सिडकोतर्फे कळविण्यात आले आहे. या मार्गावरील प्रवाशांनी याची नोंद घेऊन त्याप्रमाणे आपल्या प्रवासाचे नियोजन करून सिडकोस सहकार्य करावे.



**पनवेल : परिक्षेत्र वन अधिकारी ज्ञानेश्वर सोनवणे यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, वाकडीचे माजी सरपंच नरेश पाटील आदी उपस्थित होते.**

# मोहोपाड्यात पार्किंगअभावी वाहनचालकांची गैरसोय

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसराचा केंद्रबिंदू व मुख्य बाजारपेठेचे ठिकाण असलेल्या मोहोपाडा शहरात वाढत असलेली वसाहत, नवीन झालेले कॉलेजेस, कार्यालये तसेच कारखानदारी व त्यांच्या वसाहती यामुळे मोहोपाडा शहराची लोकसंख्या वाढत चालली असून परिसरात दुचाकी व चारचाकी वाहनांमध्ये वाढ झाली आहे.



बाजारपेठेचा केंद्रबिंदू असलेल्या मोहोपाडा शहरात सायंकाळी नेहमीच ट्रॅफिक जाम होते. आसपासच्या गावातील नागरिक बाजारहाट करण्यासाठी आले की, वाहन कोठे उभे करावे हा प्रश्न निर्माण होतो. त्यावेळी वाहनचालक मध्येच गाडी उभी करून खरेदी अथवा इतर कामासाठी बाजारात जातात.

अशावेळी एखादे वाहन आले तर त्या थांबलेल्या वाहनामुळे ट्रॅफिक जाम होवून नागरिक व प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागतो. वाहनतळ झाल्यास वाहनचालकांची गैरसोय टळेल तसेच वाहतूक कोंडीही होणार नाही. काहीवेळा तर दुकानासमोरही वाहने दुचाकीस्वार लावतात त्याला या दुचाकीस्वारांना पर्याय नसल्यामुळेच ही वाहने कोठेही लावली जातात. त्यामुळे दुकानात ग्राहकाला जाणेही कठिण होते.

वाहनचालक, ग्राहक व नागरिकांना होणारा त्रास शासनाने दूर करण्याच्या दृष्टीने मोहोपाडा शहरात एखाद्या ठिकाणी वाहन पार्किंग स्थळ तयार करावे, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

# साखरेच्या गाठ्यांनी बाजारपेठ सजली

**उरण : वार्ताहर**

उरण बाजारात होळी निमित्ताने विविध रंगाच्या साखरेच्या गाठी खरेदी करताना नागरिक दिसत आहेत. उरण बाजार पेठेत महाराष्ट्र स्वीट, राजपाल नाका, गांधी चौक, द्रोणागिरी आदी ठिकाणी साखरेच्या गाठी विकावयास आल्या आहेत. नागरिक होळीच्या पूजेसाठी लागणारी साखरेची गाठी खरेदी करतांना दिसत आहेत.



# करा साजरी होळी... दान करा पुरणपोळी!

**संकल्प शैक्षणिक, सामाजिक संस्थेचे आवाहन**

**पनवेल : वार्ताहर**

आपल्याकडे होळीला पुरणाच्या पोळ्या करण्याची परंपरा आहे. घरात गोड धोड केले जाते. 'होळीत दृष्ट प्रवृत्तीचा नाश व्हावा'... अशी त्यामागची कल्पना असते. याच भावनेनं होळीत पुरणपोळी अर्पण केली जाते. हे अन्न जळून खाक होण्याऐवजी ते गरीब आणि अर्धपोटी झोपणाऱ्यांच्या मुखात जावे या उद्देशाने संकल्प शैक्षणिक, सामाजिक संस्था गेल्या काही वर्षांपासून काम करत आहे. यंदाही होळीनिमित्त पुरणपोळी दान करण्याचा संकल्प करण्यात आला असल्याचे संस्थापिका वैशाली जगदाळे यांनी सांगितले.

दृष्ट प्रवृत्ती, वाईट, अमंगल विचार यांचा नाश करून चांगली वृत्ती, चांगले विचार अंगी बाळगावे, हा या होळीच्या सणामागील उद्देश आहे, होळीनिमित्त पुरळपोळी, रंग, धुडवड या सगळ्याचे आकर्षण तर असतेच. पनवेल परिसरामध्ये हा हिलकोत्सव ठीक ठिकाणी साजरा केला जातो. हा परिसर कोकणात येत असल्याने याला अनन्य साधारण असे महत्त्व आहे. गावागावांमध्ये होळी पेटवली जाते, त्याला पनवेल परिसरातील शहर सुद्धा अपवाद नाहीत. हा पारंपारिक सण अत्यंत उत्साहामध्ये साजरा केला जातो. जंगलामधून वाळलेले फाटे आणले जातात. त्याचबरोबर आता भाताचा पेंडासुद्धा ग्रामीण भागांमधून विकत आणला जातो. पारंपारिक पद्धतीने होळीला पुरणपोळ्या चा नैवेद्य दाखवला जातो. या पोळ्या होळीमध्ये टाकल्यामुळे त्या जळून खाक होतात. या हिंदू सणानिमित्त गरिबांचे तोंड सुद्धा गोड व्हावे या उद्देशाने होळीत पोळी न टाकता त्या जमा करण्यात येतात. यासाठी संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्थेने ही गेल्या काही वर्षांपासून पुढाकार घेतला आहे.



यंदाही होळीनिमित्त पुरणपोळी दान हा संकल्प या संस्थेने केला आहे. त्यानुसार संस्थापिका वैशाली जगदाळे यांनी पनवेल सह करंजाडे व इतर परिसरातील नागरिकांना २४ मार्च रोजी पुरणपोळी दान करण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे.

**कुंडेवहाळ येथील परंपरा**

*कुंडेवहाळ गावातील देवदूत ग्रुपच्या माध्यमातून संकल्प संस्थेच्या सहकार्याने होळीच्या सणानिमित्त पुरणपोळी त्याचबरोबर इतर पदार्थ प्रत्येक घरातून दान करण्याची परंपरा गेल्या काही वर्षांपासून सुरू करण्यात आले आहे. या पोळ्या गोरगरीब आणि झोपडपट्टी परिसरात राहणाऱ्या रहिवाशांना वाटप केल्या जातात. त्यांनाही गोडधोड देऊन सामाजिक बांधिलकी जपली जाते.*

# कोळी महासंघाच्या पनवेल तालुका अध्यक्षपदी अजय बहिरा

## रायगड जिल्हा युवक अध्यक्षपदी प्रतिक बहिरा

**पनवेल : वार्ताहर**

कोळी महासंघ महाराष्ट्रचे अध्यक्ष आमदार रमेश पाटील अध्यक्षतेखाली लोणावळा बैठक नुकतीच झाली. या बैठकीत पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक अजय बहिरा यांची कोळी महासंघाच्या पनवेल तालुका अध्यक्षपदी तसेच युवा नेते प्रतिक बहिरा यांची कोळी महासंघ रायगड जिल्हा युवक अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.



या दोघांना आमदार रमेश पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी भालचंद्र वरसोलकर, अभय पाटील, अतुल बहिरा, कृषल बहिरा आदी उपस्थित होते.

# कारच्या धडकेने एक जण जखमी

**पनवेल :** कारने मोटरसायकलला धडक दिल्याने कमलेश चंद्रकांत मोझर (३३, रा. घणसोली) जखमी झाला आहेत. या प्रकरणी कारचालकाच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कमलेश हा त्याच्या मोटरसायकलने पनवेल येथे आला. तेथून परत जाताना पनवेल गार्डन हॉटेल सिग्नल जवळ तो थांबला होता. सिग्नल मिळाल्यावर तो पुढे जात असताना बेलापूरकडून येणाऱ्या कार चालकाने त्याच्या दुचाकीला जोराची धडक दिली.

# उलवे नोड येथे होळी स्नेहसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे रियल इस्टेट ब्रोकर असोसिएशनच्या वतीने होळी स्नेहसंमेलन समारंभ सोहळा शुक्रवारी (दि. २२) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या आशीर्वादाने तसेच आमच्या असोसिएशनचे कायदेशीर सल्लागार ॲड. सुनील कुमार मौर्या यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला.




असोसिएशनचे अध्यक्ष दशरथ बिडवई, उपाध्यक्ष संतोष माने व संतोष शेलार, सचिव मनोज कुमार, उपसचिव अलोक सिंह व बाळासाहेब होनमाने, खजिनदार धनंजय कळंबे, सहखजिनदार जगदीश मीना आणि असोसिएशन कार्यकारिणी सदस्य जीतेन्द्र जाधव, राहुल चिकने, महेंद्र तांडेल, मंजु सोलंकी, अमोल चव्हाण, विठ्ठल पवार, अजय पवार, अजीत चोरगे, संगा रेड्डी नारायणपुरे, तेजस पेंढारी आणि उलवे विभागांतील रियल इस्टेट ब्रोकर सभासद यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

या वेळी पॅराडाईज ग्रुप चे सेल्समन चौबे, तेजस बिल्डरचे मॅनेजर रोहित पारकर, आणि उलवे विभागांतील बिल्डर्सच्या उपस्थित होते.

# 'चोर मचाये शोर' @ 50

## ले जाऐंगे ले जाऐंगे दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे...

गरीब नायक विजय (शशी कपूर) आणि श्रीमंत नायिका रेखा (मुमताज) यांच्या निस्सीम प्रेमाला प्रेयसीच्या खडूस पित्याचा तीव्र विरोध. (शशी कपूरच काय कोणताही कपूर गरीब वाटू शकेल काय? कपूर म्हणजे श्रीमंत खानदान हे घट्ट समीकरण. शशी कपूर तर ऐतबाज) अशा परिस्थितीत नायिकेच्या पित्याला डिवचण्यासाठी नायक व नायिकेचे मित्र मैत्रिणी नाचतात गातात

ले जाऐंगे... ले जाऐंगे दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे
रह जाऐगे...रह जाऐगे पैसेवाले देखते रह जाऐंगे

नायिकेचा पिता यावरून आणखी खवळतो आणि एका खोट्या प्रकरणात नायकाला जेलमध्ये टाकतो. तेथे त्याची राजू उस्ताद इत्यादी कैद्यांबरोबर गैरसमजातून झटापट होते. निरपराध नायक हतबल होऊन एका रात्री कैद्याच्या रूपात गातो,

घुंगरू की तरह बजता ही रहा हू मै... कभी इस पग मे

त्याच्या (खरंतर किशोरकुमारच्या) आवाजातील दर्द ऐकून भलुआ (असरानी), कलुआ (तरुण घोष) आणि राजू उस्ताद (डॅनी डेन्झोपा) यांना गहिवरून येते. ते विजयला मदत करायचे ठरवतात आणि चौघे पद्धतशीर योजनेनुसार जेल फोडून पळतात. आपणास शिक्षा झाली तरी आपली प्रेयसी गप्प या रागातून विजय रेखाला भेटायला येतो. तेव्हा त्याचा गैरसमज दूर होतो आणि हे दोघे आणि ते तिघे कैदी असे पाचजण एका गावात जाऊन राहतात. त्या गावातील जनतेचे मन जिंकतात, गावात सुधारणा करतात, गावच्या शत्रूचा पाडाव करतात वगैरे वगैरे...

**झूम प्रहर**




**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

एन. एन. सिप्पी निर्मित व अशोक रॉय दिग्दर्शित चोर मचाये शोर (मुंबईत रिलीज १७ मार्च १९७४) चित्रपटाची ही गोष्ट. तब्बल पन्नास वर्ष पूर्ण झालीदेखील. पिक्चर हिट झाले होते हो. मुंबईत अलंकार थिएटरमध्ये रौप्य महोत्सव साजरा.

आज यू ट्यूबवर हा पिक्चर एन्जॉय करताना तुम्ही त्याची तेवढी गाणीच पहाल आणि उर्वरित चित्रपट फास्ट फॉरर्वड कराल, कारण गोष्ट यथातथाच वाटेल. त्या काळात अशा 'स्टोरीज' पब्लिकला आवडत. एखाद्या गावात जाऊन तेथे सुधारणा करणे, त्या गावाला छळणारा खलनायकाचा पाडाव करणे आणि गावकऱ्यांचे मन जिंकणे अशा गोष्टी अनेक चित्रपटांत दिसत. फक्त त्याचं कव्हर वेगळे असे. नरेंद्र बेदी दिग्दर्शित 'खोटे सिक्के' वगैरे अनेक चित्रपट तसेच होते. पटकथेत कोणता मसाला घालून चित्रपट कसा रंजक केला जातो हे महत्त्वाचे असे. 'चोर मचाये शोर'चे लेखन ध्रुव चटर्जी आणि एस. एम. अब्बास यांचे. मनोरंजनाची भट्टी छानच जमलेली.

शशी कपूर व मुमताज ही जोडी याच पिक्चरमध्ये पहिल्यांदाच एकत्र आली. शशी कपूरने राज खोसला दिग्दर्शित 'दो रास्ते' (१९६९) आणि मनमोहन देसाई दिग्दर्शित 'सच्चा झूठा' (१९७०) या चित्रपटांच्या वेळेस मुमताजला आपली नायिका म्हणून स्वीकारण्यास चक्क नकार दिला होता असा किस्सा प्रसिद्ध आहे. आपली भूमिका असलेल्या श्रीधर दिग्दर्शित 'प्यार किये जा' (१९६६)मध्ये मेहमूदची नायिका असलेल्या मुमताजला आपली नायिका म्हणून स्वीकारण्यास शशी कपूरचे मन तयार होत नव्हते. चित्रपटसृष्टीचे असेही एक अंतरंग. तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल, मुमताजला आपली नायिका म्हणून स्वीकारण्यास जितेंद्र, धर्मेंद्रही सुरुवातीस तयार नव्हते. तिने ज्युनिअर डान्सरपासून सुरू केलेला प्रवास सहनायिकेच्या भूमिकेतून पुढे जात असल्याचा हा टप्पा होता. चाणक्य दिग्दर्शित 'राम और श्याम'मध्ये ती दोनपैकी एका दिलीपकुमारची श्यामची नायिका होती (प्रमुख नायिका वहिदा रेहमान) हा मुमताजच्या वाटचालीतील महत्त्वाचा क्षण. विजय आनंद दिग्दर्शित 'तेरे मेरे सपने' (१९७२) आणि देव आनंद दिग्दर्शित 'हरे राम हरे कृष्ण' (१९७२)मध्ये देव आनंदची नायिका म्हणून मुमताजची निवड होताच तिच्या मेहनत, गुणवत्ता, नृत्य व सौंदर्याचे महत्त्व अनेकांना पटले. मुमताजने एका मुलाखतीत चक्क म्हटलं, आपणास नायिका म्हणून का स्वीकारत नाही हे शशी कपूरला विचारण्यास ती मेहबूब स्टुडिओतही गेली होती. असा बाणा हवा.















शशी कपूरने 'चोर मचाये शोर' आणि राज खोसला दिग्दर्शित 'प्रेम कहानी' (रिलीज ७ मार्च १९७५) या चित्रपटात मुमताजला नायिका म्हणून स्वीकारले. 'प्रेम कहानी' हा म्युझिकल प्रेम त्रिकोण. राजेश खन्ना आणखी एक प्रेमिक नायक. यात मुहूर्ताच्या वेळेस मौशमी चटर्जी नायिका होती. राजेश खन्नाच्या आग्रहाखातर मुमताज या चित्रपटात आली आणि मग लग्न करून तिने चित्रपटसृष्टीबाहेर पडण्याचा निर्णय घेतला...

'चोर मचाये शोर' हा एन. एन. सिप्पी प्रॉडक्शन्सचा चित्रपट. वह कौन थी वगैरे चित्रपटानंतरचा त्यांचा 'चोर मचाये शोर' आणि याच्या यशानंतर शशी कपूर, असरानी, डॅनी यांना घेऊन सी. पी. दीक्षित दिग्दर्शित 'फकिरा'ची निर्मिती. नायिका शबाना आझमी. त्याशिवाय कालीचरण व मेरी जंग (दिग्दर्शक सुभाष घई), देवता (एस. रामनाथन), सरगम (के. विश्वनाथ), घर (माणिक चटर्जी), फिर वही रात (डॅनी डेन्झोप्पा) वगैरे चित्रपटांची निर्मिती केली. त्यांची स्वतःची चित्रपट वितरण व्यवस्थाही होती. जनता वितरण व सफायर रिलीज या नावाची. मला आठवतंय नाझ इमारतीत त्यांचे ऑफिस होते.

'चोर मचाये शोर'चे दिग्दर्शक अशोक रॉय यांनी कलाबाज (देव आनंद व झीनत अमान जोडी होती), हिरालाल पन्नालाल, कसम खून की, एक और एक ग्यारह इत्यादी चित्रपटांचे दिग्दर्शन केले. एक सर्वसाधारण क्षमतेचा दिग्दर्शक हीच त्याची ओळख राहिली. असे दिग्दर्शक सर्व काळात असतात.

'चोर मचाये शोर 'च्या प्रदर्शनाच्या वेळेस शशी कपूर मनोजकुमार निर्मित व दिग्दर्शित 'रोटी कपडा और मकान' (रिलीज १८ ऑक्टोबर १९७४) च्या शेवटच्या चित्रीकरण सत्रात भाग घेत होता आणि त्याला मनोमन वाटत होते, आपल्याला हिट चित्रपटाची आवश्यकता आहे. आपले सोलो हिरोचे चित्रपट अधिक प्रमाणात लोकप्रिय व्हावेत. यश चोप्रा दिग्दर्शित 'वक्त'च्या यशात बरेच वाटेकरी होते. सुरज प्रकाश दिग्दर्शित 'जब जब फुल खिले' सुपरहिट होता. तसेच यश त्याला हवे होते. मनोजकुमारने त्याची ही इच्छा ओळखून त्याला शिर्डीला साईबाबांच्या दर्शनासाठी जाण्याचे सुचवले. त्यानुसार शशी कपूर शिर्डीला गेला. त्याच दिवशी नेमका परेल येथील राजकमल कलामंदिर स्टुडिओत गुलशन रॉय निर्मित व यश चोप्रा दिग्दर्शित 'दीवार'चा मुहूर्त होता. चित्रपती व्ही. शांताराम, दिग्दर्शक विजय आनंद असे अनेक मान्यवर 'दीवार'च्या मुहूर्ताला विशेष पाहुणे म्हणून उपस्थित असतानाच शशी कपूर मात्र हजर राहू शकला नाही. त्याचीही बातमी झाली.


'चोर मचाये शोर'ची अशीही एक विशेष आठवण... चित्रपटातील गाणी आजही लोकप्रिय. दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे (आशा भोसले, किशोरकुमार व कोरस), एक डाल पर तोता बोले (लता मंगेशकर व मोहम्मद रफी) ही गाणी इंद्रजितसिंग तुलसी यांनी लिहीलेली. तर घुंगरू की तरह (किशोरकुमार), पांव मे डोरी (आशा भोसले व मोहम्मद रफी), आगरे से घाघरो (आशा भोसले) ही गाणी रवींद्र जैन यांची. चित्रपटाला संगीत रवींद्र जैन यांचे. छायाचित्रणकार के. एच. कापडिया, तर संकलन वामन गुरी यांचे.

'चोर मचाये शोर' आणखी एका गोष्टीसाठी कायमच फोकसमध्ये... यशराज फिल्म निर्मित व आदित्य चोप्रा दिग्दर्शित 'दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे' (१९९५ च्या दिवाळीत प्रदर्शित झालेला हा चित्रपट आजही दक्षिण मध्य मुंबईतील मराठा मंदिर चित्रपटगृहात मॅटीनी शोला सुरू आहेच) हा बहुचर्चित चित्रपट. 'चोर मचाये शोर 'च्या सुपरहिट गाण्याचा मुखडा एका माईलस्टोन चित्रपटाचे नाव आहे तर मग आणखी काय हवे? ले जाऐंगे ले जाऐंगे दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे... गाणे लिहिताना असा एखादा भन्नाट विक्रम होईल अशी अपेक्षा ठेवली गेली असेल असे अजिबात वाटत नाही, यातच सगळे काही आले.

दिग्दर्शक डेव्हिड धवनचाही 'चोर मचाये शोर' (२००२) नावाचा पिक्चर आहे. पडद्यावर आला तोच गेलादेखील. बॉबी देओल (डबल रोलमध्ये होता), शिल्पा शेट्टी, बिपाशा बासू, परेश रावल यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाचे केवळ नामसास्य आहे इतकेच. मूळ चित्रपटाची गंमत यात अजिबात नाही. मूळ चित्रपटात स्टाईलीश शशी कपूर, ग्लॅमरस मुमताज, विनोदाच्या टायमिंगचा असरानी आणि फिट्ट असा डॅनी डेन्झोप्पा आणि झक्कास गीत संगीत व नृत्य होते. त्यात मनोरंजनाची भट्टी छानच जमली होती...

# लोकसभेचा 'मत'संग्राम

जगातील सर्वांत मोठी लोकशाही असलेल्या भारतात लोकसभेची निवडणूक होत आहे. हा सामना भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि काँग्रेसच्या पुढाकाराने स्थापन झालेली इंडिया आघाडी यांच्यात असला तरी खरी लढत पंतप्रधान नरेंद्र मोदी विरुद्ध सर्व विरोधक अशीच आहे. चारशे पार बहुमतासह पंतप्रधानपदाची हॅट्ट्रिक साधण्याचा निर्धार मोदी व भाजपने केला आहे, तर दुसरीकडे विरोधी पक्षांसाठी ही निवडणूक त्यांचे राजकीय भवितव्य ठरवणारी कसोटी मानली जात आहे.



सन २०१४मध्ये काँग्रेस आघाडीचे (यूपीए) सरकार उलथवून केंद्रात सत्तेवर आलेल्या मोदी सरकारने पाच वर्षांचा कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण केला आणि २०१९मध्ये दुसऱ्यांदा सत्ता स्थापन केली. या दहा वर्षांच्या काळात सरकारने विविध योजना तसेच नोटाबंदी, कलम ३७० रद्द करणे, नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) यांसारखे धाडसी निर्णय घेतले. आता सलग तिसऱ्या वेळी हे सरकार पूर्ण ताकद व अनुभवानिशी निवडणुकीला सामोरे जात आहे. वाजपेयी-अडवाणी यांच्या काळात अवघ्या दोन खासदारांपासून सुरू झालेला भाजपचा हा प्रवास पंतप्रधान मोदींनी तीनशेच्या पुढे (३०३) नेला तो आपल्या वेगळ्या अशा कार्यपद्धतीने, किंबहुना भारतीय राजकारणाचा बाज त्यांनी बदलून टाकला. मेहनत आणि शिस्त भाजपमध्ये आधीपासून होती. त्यास कार्यकुशलता आणि मुत्सद्देगिरीची जोड देत यशात सातत्य कसे टिकवायचे हे पंतप्रधान मोदींनी पक्षाला शिकवले. आज सर्वाधिक सदस्य असलेला पक्ष म्हणून भाजप हा केवळ देशातच नव्हे; तर जगात अव्वल क्रमांकावर आहे.

यंदा विरोधकांनी आपल्या संयुक्त पुरोगामी आघाडीला इंडिया आघाडी असे नवे नाव देऊन मतदारांना भावनिक साद घालण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये विविध पक्षांची मोट बांधण्याचा प्रयत्न झाला, पण या आघाडीतील एक घटक पक्ष असलेल्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी आपल्या राज्यात पक्षाचे सर्व उमेदवार जाहीर करून 'एकला चलो रे'ची भूमिका घेतली आहे, तर आघाडीतील आम आदमी पक्षानेही स्वबळाचा सूर आळवला आहे. आता उर्वरित पक्ष एकत्र राहणार की जागावाटपावरून आणखी कुणी वेगळी चूल मांडणार हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

काँग्रेससाठी तर या वेळची निवडणूक अस्तित्वाची लढाई आहे. एकेकाळी संपूर्ण देशावर अधिराज्य गाजवणारा हा पक्ष आता आपले राजकीय स्थान टिकवण्यासाठी अक्षरशः झगडताना दिसतो. काँग्रेसने ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे यांना अध्यक्ष करून घराण्याबाहेरील व्यक्तीला हे महत्त्वाचे पद दिले असले तरी आजही पक्षावर कमांड गांधी परिवाराचीच आहे. काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी हे पक्षाच्या वतीने प्रचाराची प्रमुख धुरा सांभाळत आहेत, मात्र त्यांच्या नेतृत्वाला मर्यादा आहेत. त्यांनी दोन पदयात्रा करून लोकसभा निवडणुकीसाठी वातावरण निर्मितीचा प्रयत्न केला. या दरम्यान झालेली कर्नाटक विधानसभा निवडणूक काँग्रेस पक्षाने जिंकली. त्यामुळे राहुल गांधींसह काँग्रेसला हुरूप आला. खरंतर कर्नाटकमध्ये स्थानिक पातळीवर भाजपची रणनीती आणि उमेदवार निवड चुकली होती, जे त्यांनी निकालाअंती मान्य केले. यानंतर लोकसभेची सेमी फायनल म्हणून पहिल्या जाणाऱ्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत भाजपने तीन प्रमुख राज्ये जिंकून जोरदार मुसंडी मारली आणि देशात आपलीच हवा कायम असल्याचे दाखवून दिले.


वास्तविक, दोन मोठ्या लोकसभा पराभवांनंतर पक्ष संघटना बळकट करून नियोजनबद्ध तयारीने वाटचाल करणे काँग्रेससाठी क्रमप्राप्त होते, पण त्याकडे वरिष्ठांनी दुर्लक्ष केल्याने अनेक नेते पक्ष सोडून जात आहेत. परिणामी हा पक्ष दिवसेंदिवस कमकुवत होताना पहावयास मिळते. दुसरीकडे सर्वकाही आलबेल असूनदेखील भाजप पूर्ण तयारीनिशी व अधिक जोमाने मैदानात उतरला आहे. हाच या दोन प्रमुख पक्षांतील फरक आहे. जागावाटपातही भाजपने आघाडी घेत एकूण ५४३ जागांपैकी निम्म्याहून अधिक उमेदवारांची घोषणा केली आहे.

महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागांसाठी महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत आहे. महायुतीतील भाजप आणि महाआघाडीतील काँग्रेस यांनी आपले काही उमेदवार जाहीर केले आहेत, तर सहकारी पक्षांचे उमेदवार घोषित होणे अद्याप बाकी आहे. त्या दृष्टीने दोन्हीकडे चर्चेच्या फेऱ्या सुरू आहेत. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महायुतीमध्ये आता महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा आणखी एक भिडू सहभागी होण्याची चिन्हे आहेत. तसे झाल्यास मनसेला पहिला खासदार मिळू शकतो, तर मनसेच्या समावेशामुळे महायुतीला लोकसभा निवडणुकीबरोबरच आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत महाआघाडीला प्रामुख्याने शिवसेनेला शह देण्यास मदत होऊ शकते. महाआघाडीतही काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांच्यासोबत वंचित बहुजन आघाडी सहभागी होऊ पाहत आहे. जागावाटपाच्या कळीच्या मुद्द्यावरून मात्र त्यांचे घोडे काही पुढे सरकत नाहीए.

निवडणूक जवळ येत असल्याने जागावाटपाच्या प्रक्रियेला वेग आला आहे. येत्या आठवड्यात हे चित्र स्पष्ट होऊ शकते. प्रमुख पक्षांचे सर्व उमेदवार जाहीर झाल्यावर प्रचाराची रणधुमाळी सुरू होईल. त्यानंतर राजकीय 'मत'संग्रामाला खऱ्या अर्थाने रंगत येणार आहे.

**-समाधान पाटील, पनवेल**

# प्रसिद्ध लेखक व.पु. काळे



वसंत पुरुषोत्तम काळे म्हणजेच व.पु. यांचा जन्म २५ मार्च १९३२ रोजी झाला. ते मराठी भाषेतील लेखक, कादंबरीकार, कथाकथनकार होते. त्यांचे विचार, साहित्य रसिकांमध्ये खूप प्रसिद्ध आहेत. हसता हसता डोळ्यांत पाणी आणणारा असा त्यांचा विनोद असे. विशेषत: तरुणाईच्या मनावर 'वपुं'नी आपल्या लेखनाच्या माध्यमातून गारूड केले. जगणे हीसुद्धा एक कला आहे, ती आपण अवगत करायला हवी, असा संदेश ते अगदी सहज देऊन जात असत.

व. पु. या दोन अक्षरांवर तमाम रसिक अजूनही प्रेम करत आहेत. त्यांचे विचार आदानप्रदान करीत आहेत. 'वपु' मुंबई महापालिकेत होते. पेशाने वास्तुविशारद होते, पण वास्तू साकारताना त्यांनी किती सुंदर सुंदर पुस्तके आपल्या मराठी मातृभाषेत लिहिली याला तोड नाही. 'वपुं'चे मराठी लिखाण सामान्य माणसाच्या जीवनाला भिडणारे, समृद्ध करणारे आहे. आपण सारे, अर्जुन, गुलमोहर, गोष्ट हातातली होती, घर हरवलेली माणसं, दोस्त, माझ्या माझ्यापाशी, मी माणूस शोधतोय, वन फोर द रोड, रंग मनाचे, माणूस, वपुर्झा, हुंकार असे पत्रसंग्रह, ललीतप्रकार खूपच प्रसिद्ध आहेत तसेच तप्तपदी ठिकरी व वाट एकटीची यासारख्या कादंबऱ्या खूपच गाजल्या.

आपल्या लिखाणातून जगण्याचं तत्त्वज्ञान सोप्या पण रंजक पद्धतीने सांगणारे थोर साहित्यिक म्हणजे व.पु. काळे. त्यांचा वाचकविश्वात स्वतंत्र असा संप्रदाय आहे. 'वपुं'नी ६०पेक्षा जास्त पुस्तकांचे लिखाण केलं. त्यातील पार्टनर, वपूर्झा ही वाट एकटीची यांचे कथाकथन त्यांनी स्वतः केलं. या कथाकथनाला प्रेक्षकांनी भरपूर दाद दिली आणि ऑडिओ कॅसेटमधून घराघरात पोहचणारे 'वपु' पहिले लेखक ठरले. पेशाने आर्किटेक्ट असणारे 'वपु' इमारतींच्या आराखड्याचे रेखन करण्यापेक्षा लेखन करू लागले आणि मराठी साहित्याला एक थोर साहित्यिक लाभला.

'वपुं'चं लिखाण चौफेर होतं. कथा, ललित, नाटक, वैचारिक, चरित्र, आत्मचरित्र्य असे सर्व लेखन प्रकार त्यांनी हाताळले. लेखनातील विशेष बाब म्हणजे कथा संपताना कथेत अचानक येणारा ट्विस्ट. त्यांच्या कथा जिवंत माणसांच्या, नातेसंबंधांच्या, स्वैर वेड्या मनाचे विविध कंगोरे अधोरेखित करणाऱ्या असत. 'वपुं'ची कथा वाचताना डोळ्यांसमोर कथेचे कथानक तरळते. कथा वाचून झाल्यावरही त्यातले एक एक प्रसंग स्लाइड शोप्रमाणे डोळ्यांसमोरून सरकत राहतात. लेखकाला कथा आपली वाटावी असं 'वपु' लिहीत असत. त्यांच्या पार्टनर, झोपाळा, आपण सारे अर्जुन, ऐक सखे, चतुर्भुज, काही खरं काही खोटं अशा अनेक पुस्तकांवर, त्यांच्या कादंबऱ्या आणि कथांवर वाचकप्रियतेची मोहोर उमटली आहे. त्यांचे 'पार्टनर' हे पुस्तक भरपूर लोकप्रिय आहे. सर्व लेखनाचे, कथाकथनाचे श्रेय त्यांनी त्यांच्या पुण्याच्या चिंचोरे गुरुजींना दिले होते.

व.पु. काळेंना महाराष्ट्र शासनाचा उत्तम लेखकाचा सन्मान, पु.भा.भावे पुरस्कार, फाय फाऊंडेशनचा पुरस्कार तसेच अमेरिकेत आयोजित करण्यात आलेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद बहाल केले गेले. 'वपुं'च्या चाहत्यांची संख्या वाढत असून त्यात तरुणांची संख्या जास्त आहे. अशा या थोर लेखकाचे २६ जून २००१ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

# होळी... आनंद आणि उत्साहाची उधळण करणारा सण

भारतात प्रत्येक सण उत्साहात साजरा केला जातो. होळी हा असा सण आहे, ज्यात रंग आणि आनंदाची उधळण केली जाते. होलिकादहन, धुलिवंदन, रंगपंचमीचा आनंद लुटण्यासाठी प्रत्येकजण वाट पाहत असतो. यासाठी घरोघरी विशेष तयारी केली जाते. संपूर्ण भारतात हा सण मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो.

आपल्या भारतासारखा जगात दुसरा कोणताही देश नाही, जिथे लोक एकत्र येतात आणि भेदभाव न करता बंधूभावाने सर्व सण-उत्सवांचा आनंद घेतात. होळी हा सण हिंदूंचा सण आहे, परंतु तरीही सर्व धर्माचे लोक एकत्र येऊन हा सण प्रेमाने साजरा करतात. त्यामुळे या सणात एकमेकांबद्दल आपुलकी वाढते.

होळीचे नाव ऐकताच मनामध्ये आनंदाची भावना निर्माण होते. होळी हा एक असा सण आहे, ज्यामध्ये लहान मुलांपासून वृद्धापर्यंत सर्वजण सहभागी होतात आणि तो मोठ्या उत्साहाने साजरा करतात. म्हणून या सणाला सर्व आनंदाचा सण असेही म्हणतात. भारतात प्रत्येक प्रांतात निरनिराळ्या पद्धतीने होळी साजरी केली जाते. महाराष्ट्रात विशेषतः कोकणात होळीचा सण शिमगा या नावाने प्रसिद्ध आहे. गणेशोत्सवाप्रमाणेच शिमग्यालाही कोकणात उत्साहाचे वातावरण असते.



संपूर्ण भारतात या सणाला होलिकादहन केले जाते, परंतु प्रत्येक प्रांतातील होलिकेची रचना निरनिराळ्या पद्धतीने केली जाते. महाराष्ट्रात काही ठिकाणी होळीच्या दिवशी रात्री १२ वाजता, तर काही ठिकाणी पहाटे होलिकादहन केले जाते. यासाठी सार्वजनिक ठिकाणी लहान मोठ्या होलिका उभारल्या जातात. गावकरी एकत्र येऊन प्रार्थना, मंत्रोउच्चारात होलिकेचे दहन करतात. कोकणात होलिका दहन केल्यावर बोंब मारण्याची प्रथा आहे. होळीत नारळ अर्पण करून तिला नैवेद्य दिला जातो. हा नैवेद्य खाण्यासाठी काही तरबेज गावकरी जळत्या होलिकेत हात घालून तो नारळ काढतात. अग्निदेवतेची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी होलिकादहन केले जाते. वसंत ऋतूच्या आगमनामुळे या काळात वातावरणात थंडावा निर्माण झालेला असते. होलिका दहन केल्याने वातावरणाचा समतोल राखण्यास मदत होते.

होलिका दहन केल्यानंतर पुढील दिवस गुलाल, अबीर आणि विविध रंगाची उधळण करून धुळवड साजरी केली जाते. या वेळी नाच, गाणीही सादर केली जातात. त्याचप्रमाणे रंगपंचमीही साजरी होते. रंग हे आनंद आणि उत्साहाचे प्रतिक असतात. म्हणून ते एकमेकाला लावून रंगपंचमी साजरी होते. या वेळी सेंद्रिय आणि नैसर्गिक रंग वापरा. सर्वांना शुभेच्छा! (साभार : इंटरनेट)

# पंतप्रधान मोदींच्या गॅरंटीने देशाला आत्मनिर्भर बनविले

## आमदार महेंद्र थोरवे यांनी काढले गौरवोद्गार

**पेण : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गॅरंटीने देशाला आत्मनिर्भर बनविले आहे. देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदींसारख्याच सक्षम नेतृत्वाची गरज आहे. त्यांच्या कार्यकाळात अनेक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले आहेत त्यामुळे महाराष्ट्रात विकासाची गंगा आली आहे. राज्यासह देशाला पुढे नेले आहे, असे प्रतिपादन कर्जत खालापूर मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार महेंद्र थोरवे यांनी केले.



लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पेण येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा कार्यकारिणीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर शिवसेनेचे प्रतोद आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, संपर्क नेत्या शिल्पा देशमुख, रायगड ज्येष्ठ जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, उत्तर रायगड जिल्हाप्रमुख संतोष भोईर, दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख राजा केणी, रामदास शेवाळे, प्रकाश देसाई, उत्तर रायगडच्या मेघाताई दमडे, संपर्क प्रमुख अरुण चाळके, महाराष्ट्र युवा सेनेचे सचिव विकास गोगावले, यांसह जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

आमदार थोरवे पुढे म्हणाले की, आता सर्व उपस्थितांनी आपले अनमोल विचार आपल्या भूमिका प्रखरपणे मांडल्या आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीत रायगड आणि मावळ मतदार संघातील ज्या उमेदवारांना उमेदवारी दिली जाईल त्यांना पाठबळ देऊन सर्वच कार्यकर्त्यांनी जोमाने कामे करावीत. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १ एप्रिलपासून बैठका घेऊन यंत्रणा कार्यरत आहेत. तर रायगड जिल्ह्यात चुकीचे राजकारण खपवून घेतले जाणार नाही. जे जे उमेदवार दिले जातील त्यांची कामे सर्वच कार्यकर्त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे करावीत असे आमदार महेंद्र थोरवे यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले.




**कर्जत : होळीसाठी साखरगाठी लागतात. बाजारपेठेत या गाठींची दुकाने थाटण्यात आली असून गाठी खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी होत आहे.** (छाया : विजय मांडे)

## मतदारांसाठी जनजागृती कार्यक्रम

**मुरूड : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाकडून मतदारांची संख्या वाढावी यासाठी मतदारांना प्रशिक्षित करण्यासाठी जनजागृती कार्यक्रम हाती घेतला आहे. या उद्देशाने मुरूडचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी शिक्षकांची सभा घेवून प्रत्येक गावात प्रभातफेरी, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा घेण्याचे आदेश दिले.



या वेळी त्यांनी पालक व मतदारांमध्ये निष्पक्ष व सक्रीय मतदानासाठी व निवडणूकीत मतदारांचे महत्व पटवून देण्याची भूमिका मांडली. तसेच मतदारांनी डोळसपणे मतदान केल्यास तुमचं मत देश घडवेल, असे प्रतिपादन केले. मतदान ही संविधानीक प्रक्रिया असून लोकांचा निवडणूकीत सहभाग वाढला तर देश नक्कीच प्रगतीपथावर जाईल असेही नमूद केले. या सभेवेळी तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

# पर्यावरणपूरक होळी साजरी करा!

## सावरीच्या झाडांची कत्तल थांबविण्याची वृक्षप्रेमींची मागणी

**पेण : प्रतिनिधी**

होळी हा सण कोकणामध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला जात असून होलिकोत्सव सण येत्या २४ मार्च रोजी असल्याने याकरीता होळीसाठी चार–आठ दिवस अगोदरच गावकरी जंगलात सावरीचे झाड शोधून त्या झाडांची तोड केली जाते मात्र झाड हे माणसाला ऑक्सिजन, हवा, सावली देत असल्याने होळीसाठी यांची तोंड करू नये, अशी मागणी तसेच आवाहन वृक्षप्रेमी प्रा. उदय मानकवळे यांनी केले.

पेण प्रायव्हेट हायस्कूलच्या मैदानावर पर्यावरणपूरक होळी साजरी करण्यात आली. यावेळी प्रायव्हेट हायस्कूल जुनियर कॉलेजच्या प्राचार्या सौ. अंजली जोशी मॅडम, उपप्राचार्य पोपटराव भांडवलकर, एस.जी. पाटील, सामाजिक वनीकरण विभागाच्या अमिता टेमकर, प्रा. उदय मानकवळे, अथर्व घाटेसर, मीत पंड्या सर, राष्ट्रीय हरित सेना, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी माहिती देताना प्रा. उद्या मानकवळे यांनी सांगितले कि, होळी हा सण पुराणांमध्ये असणाऱ्या कथांचा परामर्श असून काम, क्रोध, मद, मोह, मत्सर यांच्यासह दुर्जनांची होळी करणारा सण यात नवीन तेजोमय तेजस्वी विचारांच्या अंगीकार करणे हे होय महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांपैकी सुमारे ३३ जिल्ह्यांमध्ये होळी करताना सुखी लाकूड, पेंडा, गवताचा पालापाचोळा, शेण्या, गोवऱ्या एकत्र करत विधिवत पूजा अर्चा करून त्यानंतर अग्नी देऊन होलिकोत्सव साजरा करतात, मात्र यासाठी कोकणासह रायगड जिल्ह्यात मोठी महाकाय सावरीची जिवंत झाडे तोडून जाळली जात असल्याने झाडांची खूप मोठी हानी होत आहे.

काही आदिवासी भागांमध्ये अंबा, जांभूळ, औदुंबर, सावर, आवर आणि इतरही जिवंत झाडे तोडून जाळली जातात परंतु जिवंत झाडे तोडून सण साजरा करणे योग्य नाही कोकणवासीयांनी महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांचा आदर्श घेऊन होळी हा सण जिवंत झाडांसह सावरीच्या झाडांची तोड न करता साजरी करावी महाराष्ट्राचा वरचा भाग दुष्काळग्रस्त वाळवंट होत चालला आहे.

पशुपक्षी प्राणी पाण्यापासून मरत आहेत त्यामुळे महाभयंकर संकट पुढे असताना केवळ सणांच्या नावावर हजारो झाडांची कत्तल करून त्यांना जाळणे ही फार मोठी नैसर्गिक हानी आपण करत आहोत. सावरीच्या झाडावर भरपूर प्रमाणात गडद लाल रंगाची फुले येतात त्याच फुलात असणारी मध खाण्यासाठी पशुपक्षी मोठ्या संख्येने त्यावर बसून त्याची मध खातात, मात्र आपण तोडत असलेल्या झाडांमुळे त्यांचे जीवनच नष्ट करत चालल्या आहेत. त्यामुळे नागरिकांनी या झाडांची कत्तल थांबवावी, असे आवाहन पेण एज्युकेशन सोसायटीचे प्राध्यापक तथा वृक्षप्रेमी उदय मानकवळे यांनी केली आहे.



# होळी सणाकरिता मुरूडमध्ये कोळी बांधवांच्या होड्या किनारी

**मुरूड : प्रतिनिधी**

सुमारे ३२० किलोमीटरचा सागरी किनारा रायगड जिल्ह्याला लाभला असून सागर किनारी राहणाऱ्या कोळी बांधवांचा प्रमुख व्यवसाय हा मच्छिमारीचा आहे. लाखो कुटुंब या व्यवसायावर आपला उदरनिर्वाह करीत आहेत. मुरूड तालुक्यात लहान व मोठ्या अश्या सातशे पेक्षा जास्त होड्या मच्छिमारी करीत आहेत.

सततच्या संकटांमुळे रायगड जिल्ह्यातील कोळ समाज हा पूर्णतः हवालदील झाला आहे. मासळीला योग्य दर नाही परंतु डिझेल चे दर मात्र गगनाला भिडलेले आहेत. तरी आशा बिकट परस्थितीती सामना करीत असताना मिळेल त्या मासळीवर समाधान मानून आपले कर्तव्य निष्ठेने बजावत समाधानपूर्वक व्यवसाय करीत असताना आलेले सण उत्सहात साजरे करून चेहऱ्यावर दुःखाची सावट न धाखवता होळी हा सण मोठ्या उत्सहात साजरा केला जात आहे.

मोठ्या मनाने आपली संस्कृती जपत आपला पारंपरिक होळी (शिमगा) सण आनंदाने साजरा करताना दिसत आहेत. रायगड जिल्ह्यातील असंख्य कोळी बांधव हा सण मोठ्या उत्सहात साजरा करत असतात. खोल समुद्रातून मासेमारी झाल्यावर ही मंडळी मुंबई येथील ससून डॉक (कुलाबा मार्केट) येथे मिळालेली सर्व मासळी विकून आपल्या घरी परतत असताना खंदेरीच्या वेताळ देवाचे दर्शन घेऊनच घरी परतात तर यातील काही जण गावाकडून स्वतः



च्या बोटीनेसुद्धा वेताळ देवाच्या दर्शनाला येत असतात.

आपली संस्कृती जपत आपला पारंपरिक होळी सण आनंदाने साजरा करण्यासाठी कोळी बांधवांच्या होड्या चार दिवस आधीच मुरूड समुद्रकिनारी लागल्याचे चित्र दिसून येत असते. होळी सण कोळी समाजामध्ये आवडता सण असुन तो फार श्रध्देने साजरा केला जातो. या सणाला कोळी बांधव आपल्या होड्या स्वच्छ करुन रंगीबेरंगी कापडी पट्ट्या झुली वेगवेगळ्या रंगांचे झेंडे तसेच होडीला फुलांच्या माळा लावुन होड्या किनारी लावतात किनारी येताना फटक्यांची आतषबाजी गुलालाची उधळण करीत वाद्यांच्या तालावर नृत्य करीत मोठ्या उत्साहात किनाऱ्यावर येतात.

रायगड जिल्ह्यामधील सुमारे दहा हजारपेक्षा जास्त होड्या होळी सण साजरा करण्यासाठी सागरी किनाऱ्याला येत असून सदरचा सण मोठ्या उत्साहात साजरा करीत असतात. मुंबईहून मासळी करून आलेल्या सर्व होड्या आपल्या गावी परतून होळी सण एकत्र साजरा करीत असतात. मुंबईहून आलेली होडी व त्यावर काम करणारे १५ ते १६ जण गावात परतून आपल्या नातेवाईक व मित्रांमध्ये रममाण होत असतात. किमान दहा ते बारा दिवस गावात वस्ती करून होळी साजरी करून या बोटी पुन्हा मुंबईकडे रवाना होत असतात. मोठ्या हर्षो आनंदात होळी सण हा कोळी समाजातर्फे दरवर्षी साजरा केला जात असतो.

होळीच्या सणाला कोळीवाडे भरगच्चं भरलेले असतात. सर्व बोटी किनाऱ्याला साकारून या काळात काही काळ मासेमारी बंद करून आपल्या समाजातील दुःखात असणाऱ्या लोकांना सोबत घेऊन त्यांच्या दुखत सहभागी होत असतात. दुःखात असणाऱ्या व्यक्तीचा योग्य तो मानपान केला जातो. विविध सामाजिक व धार्मिक कर्तव्यातून कोळी समाज होळीचा सण आनंदात साजरा करीत असतात.

# प्रगतशील शेतकरी महिलेकडून ऑर्किड फुलांचा यशस्वी प्रयोग

**कर्जत : प्रतिनिधी**

थंड हवेच्या प्रदेशात ऑर्किड ही महागड्या समजल्या जाणाऱ्या फुलांना बहर येत असतो, मात्र कर्जत सारख्या काहीशा उष्ण तापमानाच्या प्रदेशात पॉली हाऊसमध्ये ऑर्किड फुलांची शेती केली आहे. आपली आवड जपण्यासाठी शिक्षिकेची नोकरी सोडली आणि शेती मध्ये आपले पाय घट्ट रोवले आहेत. कर्जतमधून आठवड्याला ऑर्किडची फुले दादर येथील फुल बाजारात जावू लागली आहेत. त्यामुळे कर्जतमध्ये ऑर्किडदेखील फुलते हे सिद्ध झाले आहे.

अनेक दिवस टिकणारे फुल म्हणून ऑर्किडच्या फुलांची ओळख आहे. सतत ताजेतवाने दिसणारे हे फुल उत्सव काळात शेतकऱ्यांना मालामाल करून देणारे उत्पादन आहे. प्रामुख्याने थंड हवेत होणारे हे ऑर्किड फुलांचा हंगाम जून ते जानेवारी या कालावधीत सर्वाधिक असतो. अख्ख्या नारळाच्या लोंब्यात वाढणारा ऑर्किड फुलांचा कंद असून कोणत्याही प्रकारच्या माती मध्ये लागवड केलेली नसताना देखील ऑर्किडची शेती प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रात बहरलेली दिसते. गणेशोत्सव काळात ऑर्किड फुलांच्या एका काठीला चाळीस ते पन्नास रुपयांचा भाव मिळतो.



त्यामुळे या शेतीबद्दल उत्सुकता म्हणून कोविड काळात जग शांत झालेले असताना मुंबई येथील एका शाळेतील शिक्षिका निरुपमा मोहन यांनी कर्जत येथे शेती करण्यासाठी जमीन घेतली. त्या जमिनीत फुलांची किंवा भाजीपाला शेती करावी म्हणून त्यांनी तळेगाव येथील हॉर्टीकल्चर महाविद्यालयात प्रशिक्षण घेतले आणि कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली येथे जावून ऑर्किड शेतीचे महत्व समजून घेतले.

फुलांची आवड असलेल्या निरुपमा मोहन यांनी कर्जत येथे कृषी अधिकारी यांचा सल्ला घेतला आणि एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान मधून हरित गृह बांधण्यासाठी अनुदान मिळावे म्हणून शासनाच्या पोर्टलवर ऑनलाईन माहिती भरून प्रतीक्षा केली. जानेवारी २०२३ मध्ये वेणगाव येथील जमिनीमध्ये २० गुंठे क्षेत्रात पॉलीहाऊस उभारून घेतले. ऑर्किड फुलांची शेती करण्यासाठी अनेकांच्या सल्लानंतर पुणे येथील राईज एन शाईन या कंपनीबरोबर करार करून त्यांच्या मार्गदर्शना खाली ऑर्किड फुलांचे कंद आणून त्यांची लागवड सुरू केली. चार महिन्यांनी म्हणजे जून महिन्यात ऑर्किडची तब्बल १९ हजार कंदांची लागवड नारळाच्या लोंब्यात करण्यात आली. सुधारित प्रकारे मातीमध्ये लागवड न करता ते कंद जमिनीच्या वर तीन फूट वर जी आय पाईप यांच्या साहाय्याने उभारलेल्या बेड वर करण्यात आली. त्याच्या बाजूने खते आणि किटकनाशक यांचा वापर करण्यासाठी ठिबक सिंचन वाहिन्या जोडण्यात आल्या.

कंद लागवड झाल्यावर साधारण सात ते आठ महिन्यांनी फुले येण्यास सुरुवात होते आणि त्या झाडाची व्यवस्थित काळजी घेतली तर किमान सहा ते सात वर्षे उत्पन्न देवून शकतात. त्या फुलणावर सूर्यप्रकाश जास्त पडू नये यासाठी पॉलीहाऊसचे खाली आच्छादन टाकण्यात आले. पावसाळ्यात कधी तरी सूर्याचे दर्शन होते आणि त्यावेळी ते अच्छादन बाजूला हटवून सूर्यप्रकाश देण्याची व्यवस्था तेथे केली आहे. पॉलीहाऊस मध्ये असलेल्या ऑर्किड फुलांच्या झाडांना चांगला प्रकाश मिळावा म्हणून जमिनी लगत असलेले आच्छादन उघडण्याची व्यवस्था आहे. ऑर्किड फुलांच्या कंद यांना दररोज किमान एकवेळ आणि उन्हाळा हंगामात तीन ते चार वेळा पाणी द्यावे लागते. त्यामुळे महिला शेतकरी निरुपमा मोहन यांनी आपल्या राजनाला कालवा परिसरातील शेतीमध्ये बोअरवेल खोदून घेतल्या आहेत.

महिला शेतकरी निरुपमा मोहन यांच्या शेतातून जानेवारी महिन्यापासून ऑर्किड फुले मुंबई मधील फुल बाजारात विक्रीसाठी नेली जात आहेत. लग्न समारंभ आणि उत्सव यांच्या काळात या फुलांना मोठी मागणी असते. सध्या आठवड्यातून एकदा फुलांचे ताटवे प्लास्टिकमध्ये पॅक करून मुंबई मध्ये नेण्यात येत आहेत. कर्जत सारख्या काहीशा उष्ण हवामानाच्या प्रदेशात पॉलीहाऊस मध्ये ऑर्किडची शेतीचा यशस्वी प्रयोग झाला आहे.

या वेळी महिला शेतकरी निरुपमा मोहन यांना कृषी विभागाचे उप विभागीय अधिकारी बालाजी ताटे, तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड, मंडळ कृषी अधिकारी दिनेश कुमार कोळी आणि अन्य कृषी पर्यवेक्षक, सहायक यांच्या आठवड्यातून दोनदा भेटी असतात. या प्रकल्पासाठी शासनाच्या एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान मधून सव्वा आठ लाखाचे अनुदान पॉलीहाऊस बांधण्यासाठी देण्यात आले आहे.

**आमची** https://www.purplensnow.com **ही वेबसाईट असून त्यावर ऑर्डर घेतो आणि त्यानुसार विक्री व्यवहार सुरू आहे. कृषी अधिकाऱ्यांचे योगदान या शेतीसाठी महत्वाचे असून त्यांच्यामुळे प्रकल्प यशस्वी होतोय.**
**–निरुपमा मोहन,**
**प्रगतशील महिला शेतकरी**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः–

**मौजे – मोहो, तालुका – पनवेल, जिल्हा–रायगड.**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ८७/२/अ | ०–१५–०० | २.९६ | लक्ष्मण चाहू म्हसकर<br>सुलोचना रामदास म्हसकर<br>अभिजित रामदास म्हसकर<br>अतिष रामदास म्हसकर<br>अश्विनी प्रभाकर म्हात्रे<br>अरुणा रामदास म्हसकर |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक :– २३/०३/२०२४** **सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. मो.क्र. : ९९३०३६९८६१

# सायकल ट्रॅकवर वाहनांची पार्किंग

## पामबीच मार्गालगत प्रकार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पामबीच मार्गालगत ७.५ किलोमीटर लांबीचा सायकल ट्रॅक तयार करण्यात येत असून ११.५८ कोटी खर्चाचा हा प्रकल्प वादात सापडला आहे. बहुचर्चित सायकल ट्रॅकचा वापर चक्क ज्वेल ऑफ नवी मुंबई परिसरात फिरायला येणारे नागरिक व प्रेमीयुगलांच्या वाहनांच्या पार्किंगसाठी होत असल्याचे पहायला मिळत आहे. सायकल ट्रॅकचे काम बंद आहे.



सायकल ट्रॅकच्या कामाबाबत मतमतांतरे असून पालिकेने शासनाकडे सादर केलेल्या विकास आराखड्यात सायकल ट्रॅकचे विविध ठिकाणचे आरक्षणच रद्द केल्याने पामबीच मार्गालगतच्या सायकल ट्रॅकचे काय होणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. त्यामुळे पालिकेचे ११.५८ कोटी रुपये पाण्यात वाया जाणार असून सध्या सायकल ट्रॅक हा पामबीच मार्गालगतचा पार्किंग ट्रॅक बनल्याचे चित्र आहे. या सायकल ट्रॅकच्या कामाची मुदतही संपत आली असून अर्धवट कामामुळे पालिकेचे कोट्यवधी रुपये खर्च झाले आहेत. नवी मुंबई महापालिका मुख्यालयाजवळून सुरू होणाऱ्या या नियोजित सायकल ट्रॅकचे काम तुकड्या तुकड्यात होत असून सलग सायकल ट्रॅकची सुविधा शक्य नसल्याने कोटी रुपये खर्चाचा ट्रॅक वादग्रस्त ठरत आहे.

दरम्यान, सायकल ट्रॅक बनविण्याचा निर्णय पालिकेतने नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने विचार करून घेतला होता. भविष्यात या ट्रॅकचा फायदा होईल, असे तज्ज्ञ म्हणतात.

### मार्गात बदल आणि अतिक्रमण

पालिका मुख्यालयाजवळून सुरू होणारा सायकल ट्रॅक मोराज सर्कलपर्यंत प्रस्तावित होता. त्यानंतर त्यात बदल केला. सायकल ट्रॅकचे काम चांगल्या दर्जाचे होत नसल्याचे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. पालिकेच्या या नियोजित सायकल ट्रॅकच्या कामाची सद्यास्थिती पाहिली असता विविध ठिकाणी सिग्नल तसेच खाडी किनारा यांचा अडथळा आहे. दुसरीकडे अक्षर चौकापासून पुढे चाणक्य चौकापर्यंतच्या जागेवर अतिक्रमण झाले आहे.

# नवी मुंबई परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सलग सुट्ट्या आल्याने नवी मुंबईत असणाऱ्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात मोठ्या प्रमाणात मालाची आवक झाली होती. त्यात आज माथाडी कामगारांचे आराध्य दैवत स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित मेळावा असे दोन्ही एकत्र आल्याने काही काळ मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती, मात्र जागोजागी वाहतूक पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आल्याने वाहतूक हलती झाली होती.

चौथा शनिवार, रविवार आणि सोमवारी धुळवड अशा सलग सुट्ट्या आल्याने नवी मुंबईतील रहिवासी बाहेर गावी जाणे, सलग सुट्ट्या असल्याने बाहेरगावाचा कृषी माल दोन दिवस येणार नसल्याने आजच तो पुरवण्यासाठी अतिरिक्त मालाची आवक त्याच बरोबर माथाडी कामगार मेळावा या सर्वांच्या परिणामी एपीएमसी परिसरात प्रचंड गाड्याचे प्रमाणात वाढले होते.

नवी मुंबईबाहेर जाणाऱ्या गाड्यांची गर्दी अन्नपूर्णा चौक आणि माथाडी चौकात झाली. त्यात याच परिसरात फळ भाजी मार्केट आणि अन्य मार्केटला जाण्याचा मुख्य रस्ता असल्याने कृषी मालाची वाहतूक याच परिसरात होत होती. तसेच माथाडी मेळावा असल्याने माथाडी नेते कार्यकर्ते काही प्रमाणात माथाडी मापाडी यांच्या गाड्याही याच चौकातून जात असल्याने वाहतूक कोंडी झाली होती. या वेळी तत्काळ पावले उचलत वाहतूक पोलिसांनी जागोजागी वाहतूक पोलीस तैनात केले.

दुसरीकडे ऐन बाजार आवारात मोठ्या प्रमाणात माल वाहतूक ट्रक असल्याने बाहेरून येणाऱ्या ट्रक बाजार समितीत जागा होण्याची वाट पाहत बाहेरच रस्त्याच्या एका कडेला थांबल्या होत्या. याच ट्रकची



> **सलग सुट्ट्यांमुळे वाहनांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली. त्यात ट्रक रस्त्याच्या कडेला समितीत जागा होण्याची वाट पाहत उभे होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक झाली. वाहतूक कोंडी न होता हळूहळू का होईना वाहतूक हलत ठेवण्यात यश आले. दुपारनंतर परिस्थिती पूर्ण सामान्य होईल.**
> **–विमल बडवे,**
> **वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एपीएमसी वाहतूक शाखा**

संख्या शेकडो असल्याने बाहेरील रस्त्यांच्या दोनच मार्गिका वापरता येत होत्या. वाहतूक पोलीस तैनात केल्यावर बेशिस्त वाहन चालकांना चाप लागला.

दुपारी साडेबारानंतर माथाडी मेळावा सुटल्यावर त्यात भर पडली, मात्र ही शक्यता लक्षात घेत पोलिसांनी चोख बंदोबस्त व्यवस्था ठेवल्याने प्रचंड वाहतूक कोंडी टळली. कांदा बटाटा मार्केट ते तुर्भे स्मशानभूमी हा पायी दहा मिनिटांच्या रस्त्यासाठी किमान अर्धा पाऊण तास लागत होता. हीच अवस्था माथाडी चौक ते अन्नपूर्णा चौक दरम्यान होती, अशी माहिती सदाशिव शिंदे या रिक्षा चालकाने दिली.

# सीकेटी महाविद्यालयाप्रती प्रतिक ठाकूर यांची कृतज्ञता

## माजी विद्यार्थी संघासाठी पाच लाखांची देणगी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रतिक भरत ठाकूर यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त) च्या माजी विद्यार्थी संघासाठी पाच लाख रुपयांची देणगी देवून महाविद्यालयाशी असणारा ऋणानुबंध अधिक दृढ केला आहे.



प्रतिक भरत ठाकूर यांनी २०१२ मध्ये महाविद्यालयाच्या वाणिज्य विद्याशाखेतील व्यवस्थापन अध्ययन (बीएमएस) या विषयात पदवी शिक्षण पूर्ण करून उद्योजकता क्षेत्रात आपले कार्य आणि कर्तुत्व सिद्ध केले आहे. राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेच्या मूल्यांकन प्रणालीमध्ये महाविद्यालयाच्या विकासातील माजी विद्यार्थ्यांचे योगदान या निकषाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. याच्या परिपूर्तीसाठी महाविद्यालयाने सर्व माजी विद्यार्थ्यांना शक्यत्यापरिने माजी विद्यार्थी संघास आर्थिक योगदान देण्याकरिता आवाहन केले आहे.

प्रतिक भरत ठाकूर यांनी केलेल्या आर्थिक योगदानाबद्दल आभार व्यक्त करत, माजी विद्यार्थी संघामध्ये जमा होणाऱ्या आर्थिक संसाधनांचे उपयोजन महाविद्यालयाच्या पायाभूत तथा विद्यार्थी केंद्रित सेवांच्या विकासकार्यासाठी करण्यात येईल, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के.पाटील यांनी केले.

# विद्यार्थ्यांना किशोरावस्था आणि व्यसनाधिनतेवर मार्गदर्शन



**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा वाशिवली येथील डॉ पारनेरकर महाराज कनिष्ठ महाविद्यालय येथे संवेदना डेव्हलपमेंट फाउंडेशनच्यावतीने शनिवारी (दि. २३) इयत्ता ११वीच्या विद्यार्थ्यांसाठी किशोरावस्था आणि व्यसनाधीनता या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानाला ६८ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

संवेदना डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या मोहिनी बागडे यांनी मुलांना वयात येताना होणाऱ्या शारीरिक, मानसिक बदलांविषयी सोप्या भाषेत शास्त्रीय माहिती दिली. त्यानंतर आजकाल तरुण पिढीमध्ये वाढत चाललेल्या व्यसनांसंबंधीत चर्चा केली. तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थ हे आपल्या आरोग्यासाठी किती घातक आहेत आणि ते आपल्या आरोग्यावर किती वाईट परिणाम करतात हे सांगून आपण स्वतः ला या व्यसनांपासून कसे दूर ठेवू शकतो, याबद्दल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला विद्यार्थी वर्गाचा उत्तम प्रतिसाद मिळाला. हा कार्यक्रम होण्यासाठी पारनेरकर महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य ई.के. सोनावणे आणि प्राध्यापक अनिल पाटील सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.




**नवी मुंबई : महापालिकेच्या वतीने शहीद दिनानिमित्त मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणारे थोर स्वातंत्र्यसेनानी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी प्रशासकीय अधिकारी विलास मलुष्टे व रवी जाधव आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.**

# सानपाडा कॉलेजमध्ये प्लेसमेंट ड्राईव्ह



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ओरिएंटल एज्युकेशन सोसायटीच्या, सानपाडा कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी यांनी बुधवारी ओरिएंटल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष हुमेरा जावेद खान, सरचिटणीस वसीम जावेद खान, खजिनदार डॉ. अजीम जावेद खान, सीईओ डॉ. हैदर-ई-करार, प्राचार्य डॉ. सुर्यकांत लासुणे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले.

प्लेसमेंट ड्राईव्हचा उद्देश विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि जॉब मार्केटचे मौल्यवान संधी मिळवणे हा होता. या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये ४० पेक्षा अधिक कंपन्यांनी सहभाग घेतला. जसे Xangars, इंडियाफिलिंग्ज, कॉम्केट, सॅमीनफोटेक, डिजिटल एक्सप्रेस, युवा एंटरप्रायझेस, लॅक्मे, एल. के क्रिएटर्स, सदरलँड, एडिको, ई.ओ. एस. ग्लोब, 3 H.D. मिडिया या होत्या. कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह एखाद्या उत्सवाप्रमाणे होते आणि सुमारे १४० विद्यार्थ्यांनी अनेक कंपन्यांच्या मुलाखतींना हजेरी लावली आणि त्यासाठी निवडले गेले.

या मोहिमेचे आयोजन प्रा. विदुला कुलकर्णी (समन्वयक- प्लेसमेंट सेल) यांच्यासह समिती सदस्य प्रा. बुशरा अन्सारी, प्रा. तेजल धरमसी, प्रो. सराह सॅम्युअल आणि या मोहिमेसाठी डॉ. शीला वारभुवन (उपप्राचार्य), डॉ. रोसेलिन लिनिट्टा (उपप्राचार्य) यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# नवी मुंबई महापालिकेमध्ये सामुहिक जलशपथ

**नवी मुंबई : बातमीदार**

पाणी ही जीवनावश्यक गोष्ट असून पिण्यायोग्य पाण्याचे पृथ्वीवरील अत्यल्प प्रमाण लक्षात घेऊन उपलब्ध जलस्त्रोतांचे संवर्धन करणे व पाण्याचा काटकसरीने वापर करणे अत्यंत महत्वाचे असल्याचे लक्षात घेत संयुक्त राष्ट्र संघाने १९९३ पासून २२ मार्च हा दिवस 'जागतिक जल दिन' म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली.

या जागतिक जल दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महापालिका मुख्यालयातील विशेष समिती सभागृहात महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यासमवेत सामुहिक जलशपथ घेण्यात आली. या वेळी माजी आयुक्त राजेश नार्वेकर, माजी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व विजयकुमार म्हसाळ, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, शहर अभियंता संजय देसाई, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, मुख्य लेखा परीक्षक जितेंद्र इंगळे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.



यावर्षी संयुक्त राष्ट्र संघाने 'शांततेसाठी पाण्याचा वापर (Leveraging Water for Peace)' हे जागतिक जल दिनाचे घोषवाक्य जाहीर केले आहे. आपण या वसुंधरेला वाचवू शकतो आणि आपले भविष्य सुरक्षित करू शकतो. यासाठी देशाचा जलरक्षक म्हणून कायम कार्यरत राहण्याची मी शपथ घेत आहे अशा आशयाच्या जल शपथेमध्ये पाणी बचत व पाण्याचा विवेकी वापर करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. तसेच पाण्याचा थेंब अन् थेंब साठवून 'कॅच द रेन' या अभियानाच्या यशस्वितेसाठी मी संपूर्ण सहयोग देईन व पाण्याला एक अनमोल संपदा मानून पाण्याचा वापर करेन अशीही शपथ घेण्यात आली. पाण्याचा विवेकी वापर करण्याबाबत व पाण्याचा अपव्यय टाळण्याबाबत मी, माझे कुटुंबिय व मित्र आणि शेजाऱ्यांना प्रेरीत करेन, असेही प्रतिज्ञेत नमूद आहे.

नवी मुंबई हे स्वतःच्या मालकीच्या मोरबे धरणामुळे जलसमृध्द शहर असले तरी प्रत्येक व्यक्तीने स्वतःला किती पाण्याची गरज आहे हे ओळखून पाण्याचा आवश्यक तेवढाच वापर करण्याचे आवाहन विविध माध्यमांतून जागतिक जलदिनाचे औचित्य साधून महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# 'गरीबांच्या फ्रीज'ची मागणी वाढली

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा बाजारात मातीचे माठाला भरपूर मागणी आहे. उन्हाळ्यात अनेक मंडळी घरात फ्रीज व कुलर असतानाही जुने ते सोने म्हणून माठातील पाणी पिणे आवर्जुन पित असतात.

रसायनी व आसपासच्या परिसरात उष्म्याचे प्रमाण अधिकच वाढू लागल्याने रसायनीकर थंडपेयाची दुकाने, लिंबू सरबत, ऊसाचा रस आदी ठिकाणी आश्रय घेवून आपली तहान भागवत आहेत. रखरखत्या उन्हामध्ये प्रवास करणारा किंवा काबाडकष्ट करणारा कष्टकरी तहानेने व्याकुळ होतो. कडक उन्हामुळे त्याची तृष्णा भागतच नाही. यावेळी गरीब शेतकरी माठात नैसर्गिकरीत्या थंड होणाऱ्या पाण्यावर आपली तहान भागवून वेगळा आनंद प्राप्त करून पुन्हा आनंदाने कामाला लागतो. मोहोपाडा बाजारात एकावर एक नाना प्रकारे रचलेले विविध नक्षीने सजविलेले माठ पाहणाऱ्यांचे लक्ष वेधून घेतात.



या माठातील थंड पाण्याने घशाचा किंवा सर्दीचा त्रास होत नसल्याचे म्हटले.

रिस, सेबी वळण, मोहोपाडा मुख्य रस्त्यावर माठ विक्रेत्यांनी दुकाने थाटल्याने माठ खरेदी करण्यासाठी रेलचेल आहे. हा व्यवसाय करणारे बहुतांश उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश आदी राज्यांतून आलेले असल्याचे चित्र दिसून येत आहे. परिसरात बांबूच्या पिंजऱ्याच्या टोपलीत माठ टाकून दारोदार हिंडून विक्री करीत असल्याचे दृश्य आहे. त्यामुळे फ्रीज किंवा कुलरच्या जमान्यातही मातीच्या माठांना महत्त्व आहे. *मडका विक्रीतून आमचा उदरनिर्वाह चालत असून रोज दिवसभरात सात ते आठ हजारांची मातीची मडका विक्री होत आहे, असे नितेश कुमार या व्यावसायिकांनी सांगितले.

# महिलांना लेझीमचे वाटप



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कवी कुसुमाग्रज सार्वजनिक वाचनालय सीवूडस, नेरूळ संस्थेच्या महिलांना त्यांच्या कला गुणांना वाव मिळण्यासाठी माजी उपमहापौर अशोक गावडे यांच्या हस्ते लेझीम वाटप करण्यात आले.

या वेळी अशोक गावडे यांनी सांगितले की, लेझीम हे महाराष्ट्रातील एक पारंपरिक लोकनृत्य आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यात लेझीम हा खेळ पुरुषांनी आपले स्नायू तयार करण्यासाठी खेळला होता. आज महिला मोठ्या संख्येने लेझीम हा खेळ खेळत असून ढोल आणि ताशांच्या तालावर ठेका धरत व्यायाम व मनोरंजन अशा दोन्ही उद्दिष्टांनी लेझीम खेळली जाते.

आज लेझीम खेळ लोप पावत असताना आमच्या महिला भगिनी हा खेळ जतन करत आहेत याचा मनस्वी आनंद आणि अभिमान असल्याचे गावडे यांनी बोलताना सांगितले. आपला समाज हा उत्सवप्रिय आहे आणि प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत आपण आपली विविध सणवारांनी भरलेली संस्कृती आणि त्यात खेळले जाणारे पारंपरिक खेळ जपत आलो आहोत. त्यातीलच एक पारंपरिक महाराष्ट्रीयन संस्कृती सृजन करणारा खेळ लेझिम असल्याचेही गावडे यांनी सांगितले.

या वेळी वाचनालयाचे ललित पाठक, स्मिता गायकवाड, दीपक शिंदे आदींसह अन्य सभासद उपस्थित होते.

# होळी करा लहान, पोळी करा दान!

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा रबाळेत उपक्रम



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा रबाळे यांच्या वतीने शनिवारी (दि. २३) नवी मुंबई महानगरपालिका संचलित राजश्री छत्रपती शाहू महाराज विद्यालय शाळा क्रमांक ५५ राबाडा येथे 'होळी करा लहान व पोळी करा दान' याविषयी प्रबोधनपर व्याख्यान आयोजन करण्यात आले होते.

या वेळी रबाळे शाखेचे कार्याध्यक्ष अविनाश जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यानंतर प्रमुख मनोगतामध्ये शाखेचे प्रधान सचिव व मुख्याध्यापक अमोल खरसंबले यांनी सर्व मुलांना होळीसाठी लाकडे तोडून न आणता आपल्या अवतीभवती पडलेला केरकचरा एकत्र जमा करून त्याची होळी करा व होळीमध्ये पोळी न टाकता त्या पोळ्यांचे एकत्रीकरण करून ज्या आपल्या बांधवांना पोळी खायला मिळत नाही त्यांना ती पोळी द्या असं संदेश आपल्या मनोगतांमधून दिला त्याचबरोबर आपले दुर्गुण या होळीच्या अग्नीमध्ये जाळून टाका आणि सर्वांशी प्रेमाने वागा असा संदेश या वेळी त्यांनी दिला.

नवी मुंबई जिल्हा प्रधान सचिव प्रा. अमोलकुमार वाघमारे यांनी कार्यक्रमाचे आभार मानले व विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक रंगपंचमी साजरी करा, नैसर्गिक रंगांचा वापर करा असा संदेश दिला. या वेळी शाळेतील ४५ विद्यार्थी व शिक्षक गजानन वाख, संतोष वाजे, प्रदीप परदेशी उपस्थित होते.

# पेणमध्ये क्षयरोग निर्मूलन कार्यशाळा

**पेण : प्रतिनिधी**

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन मोहिमेंतर्गत टीबीमुक्त पंचायत अभियानासाठी पेणमध्ये जेएसडब्ल्यू व युएसईए कंपनीच्या सहकार्याने तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन हॉटेल सौभाग्य इन येथे करण्यात आले होते.

या कार्यशाळेस नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा खेडकर-पवार, संजीवनी हॉस्पिटलचे समन्वयक विश्वनाथ कोकिटकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सचिन जाधव, डॉ. किशोर देखमुख, प्रा. उदय मानकवळे, वैद्यकीय अधिकारी, आशा सेविका, ग्रामसेवक, शालेय शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी बोलताना तालुका आरोग्य अधिकारी अपर्णा खेडकर-पवार यांनी सांगितले की, पेण तालुक्यातील ६५ ग्रामपंचायतींपैकी सात ग्रामपंचायती टीबीमुक्त असून जेथे टीबी रुग्ण असतील तेथे जास्तीत जास्त जनजागृती करण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी रुग्ण नाहीत तेथे नव्याने रुग्ण होणार नाहीत याची काळजी घेणे गरजेचे असून यासाठी प्रत्येक भागात सर्वे करून माहिती घेण्याचे काम होत आहे. जर एखाद्या व्यक्तीला टीबीची लक्षणे असतील, तर त्याने किंवा परिसरातील नागरिकांनी ताबडतोब डॉक्टरांना कळविणे गरजेचे आहे. यामुळे रुग्ण संख्या कमी होण्यास मदत होईल. यासाठी तालुका आरोग्य खात्यामार्फत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.




# हिरवळ कॉलेजच्या शिक्षकांचा गुणगौरव

**माणगाव : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट, महाड या सामाजिक संस्थेने कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी एक विशेष सन्मान सोहळा नुकताच आयोजित केला होता.

या कार्यक्रमाला रोटरी क्लब ऑफ रायगड फॉर्ट महाडच्या डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मंजू फडके प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्याचबरोबर असिस्टंट गव्हर्नर सूर्यकांत महाडिक, अध्यक्ष सपना शेठ, सचिव मनीषा नगरकर, खजिनदार समीर गाडगीळ, रोटरी क्लबचे सदस्य प्रदीप शेठ उपस्थित होते.

उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षांनी वार्षिक अहवाल उपस्थितांसमोर वाचून दाखविला.

या कार्यक्रमात विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंत व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. यामध्ये हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स (कॉम्प्युटर सायन्स अ‍ॅण्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) महाडचे प्राचार्य सुदेश कदम यांना उत्कृष्ट प्रशासक व व्यवस्थापक म्हणून सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले, तर प्रा. आरती नाडकर यांना उत्कृष्ट सांस्कृतिक व्यवस्थापक म्हणून सन्माचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

मंजू फडके यांनी रोटरी संस्था सामाजिक कार्य कसे करते या संदर्भात माहिती दिली व त्यांनी स्वतःचे अनुभव विषद केले.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया, संचालिका सोनाली धारिया व मुख्य सल्लागार डॉ.संध्या कुलकर्णी यांनी पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन करून कौतुक केले व रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट संस्थेचे आभार व्यक्त केले.



# खालापूर तालुका प्राथमिक शिक्षक संघाचे गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन


विविध मागण्यांचा उल्लेख

**खोपोली : प्रतिनिधी**

अखिल भारतीय खालापूर तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने गटशिक्षण अधिकारी कैलास चोरमाले यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

या निवेदनात म्हटले आहे की, सन २०२३-२४च्या संकलित मूल्यमापन-२ तसेच इयत्ता पाचवी व आठवीच्या वार्षिक परीक्षेचे आयोजन वेळापत्रकानुसार दुपार सत्रात करण्यात आले आहे, परंतु उन्हाची तीव्रता वाढत असल्याने दोन्ही परीक्षा सकाळ सत्रात घेऊन सर्व विद्यार्थ्यांची उन्हाच्या तीव्रतेपासून मुक्तता करावी. या वेळी अन्य विविध विषयांवरही चर्चा करण्यात आली. गटशिक्षणाधिकारी यांनी त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला.

या वेळी महाराष्ट्र राज्य प्रथिमक शिक्षक संघ खालापूर तालुका अध्यक्ष संदीप जाधव, सरचिटणीस दीपक पालकर, ज्येष्ठ सल्लागार संतोष पाटील, कार्याध्यक्ष मारुती दासरे, जिल्हा उपाध्यक्ष सचिन कडू, संदीप सुर्वे, समन्वयक कांचन कडू, जयश्री सुर्वे, केंद्र प्रतिनिधी शहाजी घायतिडक आदी उपस्थित होते.

# भाऊसाहेब नेने महाविद्यालयात पदवीदान समारंभ

**पेण : प्रतिनिधी**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालय येथे शैक्षणिक वर्ष २०२२-२३मधील पदवीप्राप्त विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ मोठ्या उत्साहात झाला.

या समारंभास पीएसोचे आधारस्तंभ अ‍ॅड. बापूसाहेब नेने प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्याचबरोबर संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. मंगेश नेने, संस्थेचे माजी कार्याध्यक्ष बापूराव आठवले, सदस्य डॉ. नीता कदम, श्रीराम दातार, विनायक गोखले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदानंद धारप यांच्यासह प्राध्यापक, पदवीप्राप्त विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



प्रमुख अतिथी अ‍ॅड. बापूसाहेब नेने यांनी पदवीप्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक करीत सध्याच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येकाने स्वत: कठोर परिश्रम घेत स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करण्याचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला, तर संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. मंगेश नेने यांनीही पदवी मिळविणे हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील अतिशय गौरवास्पद क्षण असून पदवी म्हणजे करिअरला आकार देण्याची सुवर्णसंधी असल्याचे सांगितले.

प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी आपल्या प्रास्ताविकात नवीन शैक्षणिक धोरणाची माहिती सांगत हे धोरणात विद्यार्थी आणि पालक दोघांचीही भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे मत व्यक्त केले. पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांनी समाजाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याचे प्रामाणिकपणे पालन करीत येणाऱ्या निवडणुकीत सजग राहून मतदान करीत लोकशाही बळकट करण्यासाठी हातभार लावण्याचे आवाहन केले.

यानंतर मान्यवरांच्या हस्ते विविध शाखांतील पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या वेळी जवळपास १०० विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ.खाडीलकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉ. देवीदास बामणे यांनी मानले.

पदवीप्राप्त विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन डॉ. तुकाराम माळवे व प्रा. गिरीष उपाध्ये यांनी केले. प्रा गीता मेनन यांच्या नेतृत्वाखाली हा समारंभ यशस्वी झाला.

# माथेरानमध्ये इफ्तार पार्टी उत्साहात

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरान येथील बोहरा समाजातर्फे गावातील आपल्या विविध समाजाच्या बांधवांना एकत्र बोलावून इफ्तार पार्टीचे आयोजन त्यांचे धर्मगुरू मुल्लाजी यांच्या बुर्हानी विला या बंगल्यात करण्यात आले होते.

माथेरानमध्ये हिंदू मुस्लिम ऐक्याचे दर्शन नेहमीच विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून होत असते. प्रत्येक जण एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होऊन मानवतेची बांधीलकी जपतो. मुस्लिम आणि बोहरा समाजाचा पवित्र रमझान महिना सुरू झाला असून एक महिना या बांधवांचे रोजे सुरू असतात. अशावेळी या सणात सर्वधर्मीय मित्र मंडळींना एकत्रित करून आपला आनंद साजरा केला जात आहे.

इफ्तार पार्टीला शिवसेनेचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी, माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, भाजपचे माजी अध्यक्ष विलास पाटील, उपशहरप्रमुख प्रमोद नायक, निखिल शिंदे, वनसमिती अध्यक्ष योगेश जाधव, धनगर समाजाचे माजी अध्यक्ष राकेश कोकळे, चंद्रकांत सुतार, वसंत कदम यांच्यासह गावातील अन्य नागरिक उपस्थित होते. याचे आयोजन बोहरा समाजाचे जुझर हकिमी, मुस्तफा माथेरानवाला, फिरोझ मालवावाला, अब्बास राणियावाला, रोशन नेरलवाला, बंगल्याचे माळी अब्बास यांनी केले होते.



# होळीसाठी बाजारपेठा सजल्या

## मुखवटे, कलर, विविध प्रकारच्या पिचकाऱ्या दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

होळी तसेच धुलिवंदनचा काही तासांवर येऊन ठेपला असल्याने बच्चेकंपनीमध्ये मोठा उत्साह दिसून येत असून बाजारपेठा होळी सणाच्या आगमनासाठी सजल्या आहेत.

बाजारपेठत विविध प्रकारच्या पिचकाऱ्या, रंग, मुखवटे अशा विविध वस्तूंची ग्राहकांना भुरळ पडत आहे. होळी, धूलिवंदन, रंगपंचमी म्हणजे 'बुरा न मानो होली है' म्हणत आनंद व्यक्त करणारा आबालवृद्धांचा सण आहे. या निमित्ताने आपापसातील वैर विसरून अनेकजण एकत्र येत हा सण साजरा करण्याची जणू भारतीय परंपरा आहे. त्याचप्रमाणे या सणाला पौराणिक महत्त्व असल्याने हिंदू समाजात हा सण महत्त्वाचा मानला जातो.

या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत होळीच्या नैवेद्याचे पापड, फेण्या, कुरडया तसेच रंगपंचमीला रंग खेळण्यासाठी पिचकाऱ्या बाजारात दाखल झाल्या आहेत. होळी सणाच्या स्वागतासाठी जय्यत तयारी असल्याचेसुध्दा दिसून येते. आठवड्याचा भरत असलेल्या बाजारात महिलावर्गाची होळीचे साहित्य खरेदी करण्याची लगबग सुरू आहे, तर बच्चेकंपनीकडून रंग व पिचकाऱ्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी होत आहे.



# खालापुरातील रानसई-उचाट गावची अनोखी होळी

## गावकऱ्यांकडून आजही जपली जाते पूर्वपार परंपरा अन् श्रद्धा

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील कोयना धरण पुनर्वसित रानसई-उचाट गाव आजही आपल्या आगळ्यावेगळ्या रिवाज व पद्धतीने प्रसिद्ध आहे. या गावाचा होळी सण संपूर्ण तालुक्यात प्रसिध्द आहे. पिढी बदलली तरीही गावाची पूर्वपार परंपरा व श्रद्धा जपण्यासाठी गावकऱ्यांची धडपड अनोखी असते.

होळी हा रानसई-उचाट गावचा मुख्य सण असून यानिमित्ताने नौकरी-व्यवसायासाठी कोणत्याही ठिकाणी वास्तव्यास असलेले कुटूंब होळीच्या दिवशी हमखास गावात येऊन एकत्रितपणे होळीचा महोत्सव साजरा करतात.



१९६१च्या सुमारास कोयना धरणासाठी महाबळेश्वरच्या खोऱ्यात व चिपळूण तालुक्यातील सह्याद्रीच्या पर्वत रांगेत विसावलेल्या या गावचे स्थलांतर होऊन पुनर्वसन खोपोली-पेण रस्त्याला लागून रानसई-उचाट गावाच्या रुपाने झाले. हे गाव येथील स्थानिक संस्कृती व मातीत पूर्णपणे मिसळले आहे, परंतु गावाने आपली पूर्वपार संस्कृती, सण, उत्सव राजरा करण्याची परंपरा मात्र सोडलेली नाही. उलट नव्या पिढीने तर ती अधिकच मजबूत केली. आता याच अनोख्या परंपरा जोपासण्यामुळे हे गाव तालुक्यात वेगळ्या अर्थाने प्रसिद्ध आहे.

गावात साजरा होणारा अनोखा होळी सण तालुक्यातील चर्चेचा विषय बनला आहे. येथे होळीचा सण अनोख्या पद्धतीने आजही साजरा केला जातो. या निमित्ताने संध्याकाळी गावदेवी गावडाई-झोलाई देवीचा भव्य पालखी सोहळा होतो. त्यानंतर रात्री बरोबर १२ वाजता होलिका दहन परंपरा व सर्व धार्मिक विधी करून सामूहिकपणे केले जाते. गावातील सर्व सुवासिनी महिला पारंपरिक पद्धतीच्या मराठी पेहरावात होळीची पूजा करतात. होळीच्या दिवशी गावदेवीचा उत्सव पूर्णपणे कोयना खोऱ्यातील जुन्या परंपरा व रीतिरिवाजानुसारच साजरा केला जातो. या सर्व कार्यक्रमांत कोयना खोऱ्यातील परंपरा आजही जपण्यात येते व त्यात रायगडची संस्कृतीचे मिश्रण केले जाते. दुसऱ्या दिवशी धुलिवंदनाच्या निमित्ताने संपूर्ण गाव विविध रंगांत न्हाऊन निघते. यात महिला, पुरुष व बच्चेकंपनी मोठ्या आनंदात सहभागी होतात.

पन्नास वर्षांपूर्वी जेव्हा संपूर्ण गावाला रायगड जिल्ह्यात पुनर्वसनाचा निर्णय सांगण्यात आला तेव्हा छातीवर दगड ठेवत गावकऱ्यांनी तो निर्णय मान्य केला. गाव स्थलांतरीत करताना गावदेवी गावडाई-झोलाई देवीची विधिवत स्थापना करुन या स्थानाला गावदेवी श्री गावडाई झोलाई देवी म्हणून विकसित करण्यात आले व विद्यमान स्थितीत निसर्गसंपन्न परिसरात भव्य मंदिर उभारण्यात आलेले आहे.

### शंभर टक्के साक्षरता

*देशाच्या संरक्षण व राज्य पोलीस खात्यात या गावातील मोठ्या संख्येने तरुण कार्यरत आहेत तसेच शिक्षक , विविध सरकारी नौकऱ्यांसोबत स्वयंम उद्योग व खासगी नोकरीमध्येही हे गाव अग्रेसर असल्याने गावात सुबत्ता आहे. शैक्षणिक स्तरावर गावाने आघाडी घेतली असून गाव शंभर टक्के साक्षर बनले आहे. नोकरी-व्यवसायानिमित्ताने देशात कोणत्याही ठिकाणी वास्तव्यास असणारे कुटुंब खास होळी सण साजरा करण्यासाठी रानसईमध्ये दाखल होतात आणि आनंदाने सणात सहभागी होतात.*

# आयपीएलमध्ये पंजाबची दिल्लीवर मात

## सॅम करनचे दमदार अर्धशतक



**चंदिगड : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२४मधील दुसरा सामना शनिवारी (दि.२३) चंदिगड येथील महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये रंगला. या सामन्यात दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्ज आमनेसामने आले होते, ज्यामध्ये पंजाबने सॅम करनच्या दमदार अर्धशतकाच्या जोरावर दिल्लीवर चार विकेट्सनी मात करीत आपला पहिला विजय नोंदवला. दिल्लीने प्रथम फलंदाजी करताना अभिषेक पोरेलच्या वादळी खेळीच्या जोरावर नऊ बाद १७४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात पंजाब किंग्जने १९.२ षटकांत सहा गडी गमावून विजय मिळवला.

नाणेफेक हारून प्रथम फलंदाजीला आलेल्या दिल्लीची सुरुवात अतिशय वेगवान झाली. सलामीवीर डेव्हिड वॉर्नर आणि मिचेल मार्श यांनी पहिल्या विकेटसाठी ३९ धावांची भागीदारी केली. चौथ्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर अर्शदीप सिंगने मार्शची विकेट घेतली. त्याने १२ चेंडूंत दोन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने २० धावा केल्या. ७४ धावांवर दिल्लीला दुसरा धक्का बसला. धोकादायक दिसणाऱ्या वॉर्नरला हर्षल पटेलने आपला बळी बनवला. वॉर्नरने २१ चेंडूंत २९ धावांची खेळी खेळली.

यानंतर शाई होपने २५ चेंडूंत ३२ धावा जोडल्या. सुमारे १५ महिन्यांनंतर पुनरागमन करणारा दिल्लीचा कर्णधार ऋषभ पंत मोठी खेळी खेळू शकला नाही. त्याने १३ चेंडूंत १८ धावा केल्या. रिकी भुईने सात चेंडूंत केवळ तीन धावा केल्या. अशा प्रकारे दिल्लीने ठराविक अंतराने विकेट्स गमावल्या. यानंतर प्रभावशाली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या अभिषेक पोरेलने फलंदाजीत महत्त्वाचे योगदान दिले. त्याने १० चेंडूंत चार चौकार आणि दोन षटकारांनिशी ३२ धावा केल्या.

# सीएसकेची विजयी सलामी

## पहिल्या सामन्यात 'आरसीबी'वर मात



**चेन्नई : वृत्तसंस्था**

शिवम दुबेच्या उपयुक्त खेळीसह चेन्नई सुपर किंग्सने पहिल्याच सामन्यात सहा विकेट्सने मोठा विजय नोंदवला. रवींद्र जडेजा आणि दुबेची भागीदारी महत्त्वपूर्ण ठरली मुस्तफिझूर रहमान हा चेन्नईच्या विजयाचा शिल्पकार ठरला. त्याने गोलंदाजी करताना चार विकेट्स घेत आरसीबीच्या फलंदाजांची कंबरडे मोडले.

चेन्नईच्या फलंदाजांनी चांगली फलंदाजी केली, पण त्यांनी ठरावीक अंतराने विकेट गमावल्या. प्रत्येक खेळाडूने फलंदाजी करीत संघाच्या धावांमध्ये आपले योगदान दिले. इम्पॅक्ट प्लेअर म्हणून आलेल्या शिवम दुबेने पुन्हा एकदा प्रभावी फलंदाजी केली, तर जडेजाने त्याला साथ देत काही मोठे फटके खेळले. १८ चेंडूंत १८ धावा असा अटीतटीचा सामना सुरू असताना शिवमने दोन चौकार लगावत चेन्नईला विजयाच्या अधिक जवळ आणले. त्याने २८ चेंडूंत एक षटकार आणि चार चौकारांसह ३७ धावा केल्या, तर जडेजाने १७ चेंडूंत एका षटकारासह २५ धावा केल्या.

चेन्नईकडून मिळालेल्या १७४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नवा कर्णधार ऋतुराज गायकवाडने मोहम्मद सिराजच्या गोलंदाजीवर चौकार मारत दणदणीत सुरुवात केली. ऋतुराजसोबत सलामीसाठी रचिन रवींद्र आला. झटपट धावा करणारा ऋतुराज १५ धावा करीत झेलबाद झाला. त्याच्यानंतर रचिनने शानदार फटके खेळत संघाचा डाव पुढे नेला, पण कर्ण शर्माच्या गोलंदाजीवर तो तीन षटकार आणि तीन चौकारांसह ३७ धावा करीत बाद झाला. यानंतर डॅरिल मिचेल (२७) आणि अजिंक्य रहाणे (२२) जबरदस्त फलंदाजी करीत होते, पण फार काळ मैदानात टिकू शकले नाहीत. शिवम दुबेला इम्पॅक्ट प्लेअर म्हणून फलंदाजीसाठी उतरला. त्याच्यासोबत जडेजाने संघाचा डाव सावरला आणि थेट विजय मिळवूनच दोघे तंबूत परतले.

तत्पूर्वी आरसीबी संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. सीएसकेचा नवा गोलंदाज मुस्ताफिझूर रहमान गोलंदाजीला येईपर्यंत बंगळुरू संघाचा हा निर्णय त्यांच्यासाठी फायदेशीर ठरला. सलामीसाठी आलेल्या फॅफ डू प्लेसिसने संघाला जबरदस्त सुरुवात करून दिली. त्याने २३ धावांत आठ चौकार मारत ३५ धावा केल्या. पाचव्या षटकात मात्र आरसीबीच्या हातून सामना निसटत असल्याचे दिसले. मुस्तफिझूरच्या षटकात फॅफ (३५) आणि रजत पाटीदार (०) झेलबद झाले. पुढच्याच षटकात चहरने मॅक्सवेलला खाते न उघडताच धोनीकडून झेलबाद केले.

या मोठ्या धक्क्यांनंतर विराट कोहली (२१) आणि कॅमेरून ग्रीन (१८) हे दोघे संघाचा डाव सावरत होते, पण मुस्तफिझूरने त्यांना बराच काळ मैदानात टिकू दिले नाही. १२व्या षटकात विराटला झेलबाद करताना रचिन आणि रहाणेने अफलातून झेल टिपला, तर त्याच षटकात चौथ्या चेंडूवर ग्रीनला क्लीन बोल्ड केले. या विकेटनंतर आरसीबी संघ पूर्णपणे कोलमडला असे वाटले, पण नंतर आलेल्या दिनेश कार्तिक आणि अनुज रावत यांनी पाच बाद ७९ धावांपासून १७३ धावसंख्येपर्यंत पोहोचवला.

अनुज रावतने सामन्याचा रोख बदलत २५ चेंडूंत चार चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ४८ धावा केल्या. पहिला डाव संपल्याने त्याचे अर्धशतक हुकले, पण संघासाठी निर्णायक क्षणी महत्त्वाची इनिंग तो खेळला, तर दिनेश कार्तिकसुद्धा मोक्याच्या वेळी पुन्हा एकदा संघासाठी संकटमोचक ठरला, त्याने २६ चेंडूंत दोन षटकार आणि तीन चौकारांच्या मदतीने ३८ धावा केल्या.

# विराट कोहलीने ट्वेंटी-२०मध्ये गाठला १२ हजार धावांचा टप्पा

**मुंबई : प्रतिनिधी**

मागील दोन महिन्यांपासून क्रिकेटपासून दूर असलेल्या विराट कोहलीने आयपीएलच्या सलामीच्या सामन्यात एक पराक्रम केला. किंग कोहलीने ट्वेंटी-२०मध्ये १२ हजार धावांचा टप्पा गाठला आहे.



आरसीबीचा कर्णधार फाफ डुप्लेसिसने स्फोटक खेळी केली. त्याने २३ चेंडूंत ३५ धावा कुटल्या. घातक वाटणाऱ्या फाफला बाद करण्यात मुस्तफिजुर रहमानला यश आले. डावाच्या ४१ धावांवर आरसीबीने आपला पहिला गडी गमावला. रहमानने डुप्लेसिसला बाद करताच त्याच षटकात रजत पाटीदारला बाहेरचा रस्ता दाखवला. पाटीदारला खातेही उघडता आले नाही. त्यानंतर मॅक्सवेलदेखील बाद झाला. दुसरीकडे विराटने संथ खेळी सुरू ठेवत मोर्चा सांभाळला, पण त्यालाही जास्त काळ खेळपट्टीवर टिकता आले नाही. अजिंक्य रहाणे आणि रचिन रवींद्र यांनी अप्रतिम झेल घेऊन विराटला तंबूत पाठवले, पण तत्पुर्वी रवींद्र जडेजाच्या पहिल्या षटकातील पाचव्या चेंडूवर एक धाव काढून विराटने ट्वेंटी-२०मध्ये १२ हजार धावा पूर्ण केल्या.

विराट कोहली मागील दोन महिन्यांपासून क्रिकेटपासून दूर होता. तो दुसऱ्यांदा बाबा होणार असल्यामुळे त्याने इंग्लंडविरूद्धच्या कसोटी मालिकेतून माघार घेतली होती. आयपीएलच्या सलामीच्या सामन्याला सुरुवात होण्यापूर्वी विराटच्या नावावर ट्वेंटी-२०मध्ये ११,९९४ धावांची नोंद होती. चेन्नईविरूद्धच्या सामन्यात सहा धावा करताच त्याने ऐतिहासिक कामगिरी केली. खरंतर तो १२ हजार ट्वेंटी-२० धावा करणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. या सामन्यापूर्वी त्याने ३७६ ट्वेंटी-२० सामन्यांमध्ये ११,९९४ धावा करण्याची किमया साधली होती.

ट्वेंटी-२०मध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंमध्ये युनिव्हर्सल बॉस ख्रिस गेल १४,५६२ धावांसह अव्वल स्थानी आहे. यानंतर शोएब मलिक (१३,३६० धावा), किएरॉन पोलार्ड (१२,९०० धावा), ॲलेक्स हेल्स (१२,३१९ धावा), डेव्हिड वॉर्नर (१२,०६५ धावा) असा क्रम आहे. आता या पक्तींत विराटही (१२,०१५ धावा) जाऊन बसला आहे.

# रायगडच्या ज्युनिअर मुलांची क्रिकेट निवड चाचणी पेणला

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचा १९ वर्षांखालील मुलांचा क्रिकेट संघ निवडण्यासाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे पेण येथे निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे. नगरपालिकेच्या मैदानावर २६ ते २८ मार्च या कालावधीत ही निवड चाचणी होणार आहे.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आमंत्रितांच्या स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचा १९ वर्षांखालील मुलांचा संघ या चाचणीतून निवडण्यात येणार आहे, अशी महिती रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली.

१ सप्टेंबर २००५नंतर जन्मलेल्या रायगड जिल्ह्यातील रहिवाशी खेळाडूंनाच यात भाग घेता येईल. क्रिकेटचा पांढरा गणवेश आणि स्वतः



च्या साहित्यासह खेळाडूंनी २६ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता पेण नगरपालिकेच्या मैदानावर हजर राहायचे आहे. निवड चाचणीसाठी येताना आधार कार्ड आणि वयाचा दाखला खेळाडूंनी सोबत आणणे आवश्यक आहे. निवड चाचणी शुल्क २०० रुपये असणार आहे. अधिक माहितीसाठी चंद्रकांत मते (९८२२८३६४४२), प्रशांत ओक (९८२२४२२६७६), राजेश पाटील (७७७७०६४१११) यांच्याशी संपर्क साधावा.

# अजिंक्य-रचिन यांनी घेतला विराटचा अफलातून झेल




**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या पहिल्याच सामन्यात अजिंक्य रहाणे आणि रचिन रवींद्र यांनी एक भन्नाट झेल घेतला. विराट कोहलीने लगावलेल्या शॉटचा सीमारेषेजवळ शानदार झेल टिपत त्याला या दोघांनी बाद केले. आरसीबीच्या लागोपाठ विकेट पडत असताना संघाचा डाव सावरण्याची विराटवर जबाबदारी होती, पण मुस्तफिजूरच्या गोलंदाजीसमोर आरसीबीच्या फलंदाजांनी तर गुडघेच टेकले. या सामन्यातील विराटची विकेट तर पाहण्यासारखीच होती.

वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानने विराट कोहलीला शॉर्ट-पिच चेंडू टाकला. तो चेंडू फ्लिक करीत विराटने पुल शॉट मारला. चेंडू षटकारासाठी जाणार असेच दिसत होते. चेंडू हवेत गेला आणि डीप मिड-विकेटवर असलेला अजिंक्य रहाणे त्याच्या झेल टिपण्यासाठी उजवीकडे धावत गेला आणि चेंडू पकडला, पण तो सीमारेषेवर पडणार हे त्याच्या लक्षात येताच त्याने चेंडू हवेत फेकला. चेंडू येताना पाहून तिथून रचिन धावत आला आणि रहाणेने त्याच्या दिशेने चेंडू फेकला जो रचिन पकडला. अशा प्रकारे विराट बाद झाला. ३५ वर्षीय अजिंक्यने क्षेत्ररक्षणात आपली जादू दाखवली.

# डेव्हिड मिलरच्या लग्नाचे गुजरातच्या शिलेदारांकडून सेलिब्रेशन

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या सतराव्या हंगामासाठी जगभरातील स्टार क्रिकेटपटू सध्या भारतात आहेत. गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात रविवारी (दि.२४) सामना होणार आहे. या सामन्यापूर्वी गुजरातच्या शिलेदारांनी आपला सहकारी डेव्हिड मिलरला त्याच्या लग्नातील क्षण अनुभवण्याची संधी दिली.

गुजरातच्या फ्रँचायझीने एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये मिलर त्याची पत्नी कॅमिला हॅरिसला अंगठी घालताना दिसत आहे. त्यानंतर दोघे एकमेकांना मिठी मारून आनंद साजरा करतात. कर्णधार शुबमन गिलदेखील फ्रेममध्ये पाहायला मिळत आहे.

अलीकडेच डेव्हिड मिलरने प्रेयसी कॅमिला हॅरिससोबत सात फेरे घेतले. दोघेही मागील मोठ्या कालावधीपासून एकमेकांना डेट करत होते. त्यांचे लग्न केपटाउन येथे झाले. मिलरची पत्नी कॅमिला ही एक पोलो खेळाडू आहे. त्यांच्या लग्नात दक्षिण आफ्रिकेच्या क्रिकेट संघाचे आजी माजी खेळाडू सहभागी झाले होते.

## वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा

# हिमाचल प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश यांचा बाद फेरीतील प्रवेश निश्चित

**अहमदनगर : प्रतिनिधी**

हिमाचल प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेशने ७०व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत साखळीत सलग दुसरा विजय मिळवित बाद फेरीतील आपला प्रवेश जवळपास निश्चित केला. अहमदनगर वाडिया पार्क क्रीडा संकुलात मॅटवर स्पर्धा खेळली जात आहे.

दुसऱ्या दिवशी ड गटात हिमाचल प्रदेशने कडव्या लढतीनंतर उत्तराखंडला ४९-३६ असे नमविले. मध्यांतराला २५-१९ अशी आघाडी घेणाऱ्या हिमाचलला नंतर मात्र उत्तराखंडने विजयाकरिता चांगलेच झुंजविले. शेवटची सात आठ मिनिटे असताना अवघ्या तीन गुणांची आघाडी हिमाचालकडे होती. हिमाचालचा फक्त प्रवीण ठाकूर हा खेळाडू मैदानात शिल्लक होता. त्याने आपल्या चढाईत बोनस गुणासह दोन गडी टिपत होणारा लोण वाचविला. त्यानंतर उत्तराखंडवर लोण देत आपला विजय निश्चित केला. केशव कुमार, पप्पू यांच्या संयमी



चढाया व प्रीत सिंग यांचा बचाव यामुळे हिमाचलला हे शक्य झाले. उत्तराखंडकडून प्रतीक दहिया, अमन चौहान यांनी शेवटच्या क्षणापर्यंत शर्थीची लढत दिली, पण संघाला विजयी करण्यात ते कमी पडले.

राजस्थानने ई गटात पाँडिचेरीवर ५८-२८ अशी मात करीत या गटात सलग दुसरा विजय मिळविला. विश्रांतीला २९-१४ अशी आघाडी घेणाऱ्या राजस्थानने नंतरदेखील तोच जोश कायम राखत आपला विजय सोपा केला. जय भगवान, राहुल चौधरी यांच्या झंझावाती खेळाला या विजयाचे श्रेय जाते. पाँडिचेरीकडून मोहनदास, विघ्नेश यांनी बऱ्यापैकी लढत दिली.

हिमाचल प्रदेशने ग गटात विदर्भाचा ४४-३० असा पराभव केला. पहिल्या डावात २५-१७ अशी आघाडी घेणाऱ्या उत्तर प्रदेशने दुसऱ्या डावात सावध खेळ करीत आपला विजय निश्चित केला. राहुल चौधरी उत्तर प्रदेशकडून, तर आकाश पिकलमुंडे विदर्भकडून उत्तम खेळले. याच गटात केरळने जम्मू काश्मीरला ३९-३० असे पराभूत केले.

सेनादलने ह गटात आंध्र प्रदेशवर ५६-२० अशी सहज मात केली. पहिल्या डावात तीन लोण देत ३७-११ अशी आघाडी घेणाऱ्या सेनादलाने दुसऱ्या डावातदेखील आक्रमक खेळ करीत गुणांचे अर्धशतक पार केले. भारत, मनजीत, लकी शर्मा यांच्या चतुरस्त्र खेळाला या विजयाचे श्रेय जाते. आंध्रचा चेका नागाबाबु चमकला.

याच गटात पंजाबने ओडिशाला ३७-२४ असे नमविले. कर्नाटकने विश्वास, गंगा गोधर यांच्या चढाया त्याला प्रणवची मिळालेली पकडीची साथ यामुळे तेलंगणाला ४९-३२ असे पराभूत केले. दिल्लीने अ गटात गुजरातचा ४१-३७ असा पाडाव केला. पहिल्या सत्रात २३-२० अशी आघाडी राखणाऱ्या दिल्लीला दुसऱ्या सत्रातदेखील गुजरातने विजयासाठी चांगलेच झुंजविले.

# आई-वडिलांनी उलगडली ऋतुराजची कहाणी

**पुणे : प्रतिनिधी**

चेन्नई सुपरकिंग्जचा नवनियुक्त कर्णधार ऋतुराज गायकवाड हा पिंपरी-चिंचवड शहरातील सांगवीचा. वडील दशरथ गायकवाड केंद्रीय संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या नोकरीतून सेवानिवृत्त झाले आहेत, तर आई सविता गायकवाड वाकड येथील महापालिकेच्या शाळेत शिक्षिका आहेत. दोघांना त्याच्या निवडीची बातमी सूनबाई उत्कर्षा गायकवाड यांनी फोनवरून दिली. ते ऐकताच दोघांच्याही डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.



ऋतुराजचे पालक सांगत होते की, ऋतुराज लहानपणापासून खेळकर. घरात तो शांत असतो. कामावरच त्याचे जास्त लक्ष असते. लहानपणी त्याचा क्रिकेटकडेच जास्त ओढा होता. ते लक्षात आल्यानंतर आम्ही त्याला क्रिकेटचे धडे द्यायला सुरुवात केली. घरात क्रिकेटची कोणतीच पार्श्वभूमी नाही, पण त्याच्या करिअरसाठी आम्ही क्रिकेटचा अभ्यास सुरू केला. क्रिकेटसाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी त्याच्या वाढदिवसाला घेऊन देऊ लागलो. त्याने स्वत:ला त्यामध्ये झोकून दिले. अनेक दिग्गज खेळाडूंचा त्याने अभ्यास केला. त्यांच्याकडून तो नानाविध गोष्टी शिकत गेला. त्यामुळेच आज 'सीएसके'सारख्या मोठ्या टीमच्या कर्णधारपदी त्याची निवड झाली.

ऋतुराजची २०१८मध्ये सीएसकेच्या टीममध्ये निवड झाली, मात्र तो प्लेइंग इलेव्हनमध्ये नव्हता. त्याने बाहेर बसून त्या मॅच बघितल्या. त्यानंतर पुढच्या वर्षी त्याला संघात खेळण्याची संधी मिळाली. त्या वेळी त्याने चांगली कामगिरी केली. २०१८ला प्लेइंग इलेव्हनच्या बाहेर ते त्याच संघाचा कर्णधार, हा त्याचा प्रवास आनंददायी आहे, असे वडील दशरथ गायकवाड म्हणाले.

# ...म्हणून कर्णधारपदासाठी धोनीची शिफारस केली -सचिन

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी महान फलंदाज आणि क्रिकेटचा देव, मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर आयपीएल २०२४च्या पहिल्या सामन्यादरम्यान कॉमेंट्री करताना दिसला. या हंगामाची सुरुवात सीएसके आणि आरसीबी यांच्यातील सामन्याने झाली. यादरम्यान मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरही काही काळ कॉमेंट्री बॉक्समध्ये कॉमेंट्री करण्यासाठी आला होता. त्याच्यासोबत टीम इंडियाचा माजी स्फोटक फलंदाज वीरेंद्र सेहवाग आणि आकाश चोप्रा यांचाही समावेश होता. यादरम्यान सचिनने टीम इंडियाच्या कर्णधारपदाबद्दल एक मोठा खुलासा केला.



ज्याची चर्चा आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात होत आहे.

चेन्नई आणि बंगळुरुच्या पहिल्या सामन्यादरम्यान जिओ सिनेमावर कॉमेंट्री करताना, सचिन तेंडुलकरने बीसीसीआयने त्याला टीम इंडियाच्या कर्णधार बनण्याची ऑफर दिली होती, तेव्हाची गोष्ट सांगितली. सचिनने सांगितले की, बीसीसीआयने २००७मध्ये मला कर्णधारपदाची ऑफर दिली होती, पण माझी शरीरयष्टी खूपच खराब होती. एमएस धोनीबद्दल माझे निरीक्षण खूप चांगले होते. त्याचे मन खूप स्थिर आहे, तो शांत आहे, तो सहजप्रवृत्तीचा आहे आणि योग्य निर्णय घेतो. त्यामुळे कर्णधारपदासाठी मी त्याच्या नावाची शिफारस केली.

आता सोशल मीडियावर चाहतेही यावर प्रतिक्रिया देत आहेत. एका युजरने कमेंट करताना लिहिले की, सचिन तेंडुलकर हा केवळ एक महान खेळाडू नाही, तर तो खूप बुद्धिमान व्यक्तीदेखील आहे. त्याच्यासाठी त्याचा देश आधी येतो.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com